**महाराष्ट्र विधानपरिषद**

**दुसरे अधिवेशन, २०१५**

-------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक १३ जुलै, २०१५ / आषाढ २२, १९३७ ( शके )**

**(१) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**
**सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून)**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

-------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ६६**

-------------------------------

**नाशिक शहरातील विविध स्मशानभूमीत काम करणाऱ्या मातंग समाजाच्या महिलांना टेंडर न मागवता प्रायोगिक तत्त्वावर कामे देण्याबाबत**

**(१) * ८०३० श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील विविध स्मशानभूमीत राख चाळण्याचे काम करणाऱ्या मातंग समाजाच्या महिलांना सामाजिक न्याय विभागातील वसतीगृहे व कार्यालयातील साफसफाई, माळीकाम इत्यादी कामे टेंडर न मागवता प्रायोगिक तत्त्वावर देण्याबाबत दि. ३१ जानेवारी, २०१४ रोजी शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याकरीता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत येणारी व खाजगी संस्थांकडून चालविली जाणारी ५९ समाजकार्य महाविद्‌यालय (एम.एस.डब्यू) उच्च शिक्षण विभागास जोडण्याबाबत**

**(२) * ७९४८ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.धनंजय मुंडे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.हेमंत टकले, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत येणारी व खाजगी संस्थांकडून चालविली जाणारी ५९ समाजकार्य महाविद्‌यालय (एम.एस.डब्यू) उच्च शिक्षण विभागास जोडण्याबाबतच्या सामाजिक न्याय विभागाने पाठविलेल्या प्रस्तावास उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मागील २ वर्षापासून अद्‌यापही मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित महाविद्‌यालयातील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी हे विद्‌यापीठ अनुदान आयोग व उच्च शिक्षण विभागाकडून मिळणाऱ्या सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर महाविद्‌यालये उच्च व तंत्रशिक्षण विभागाला जोडण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्‌याप कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२), (३) व (४) सदर प्रस्तावा संदर्भात शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे एमआयडीसी उभारण्याबाबत

**(३) * ७९२४ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे एमआयडीसी उभारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विचाराधीन बाबींवरील शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार पंढरपूर येथे एमआयडीसी उभारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) पंढरपूर (जि.सोलापूर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी मौजे भाळवणी, ता.पंढरपूर येथील ५५९.०४ हे.आर. खाजगी व १.३८ हे.आर. सरकारी असे एकूण ५६०.४२ हे.आर. इतके क्षेत्र अधिसूचित करण्याचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीच्या दिनांक ५/१२/२०१३ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला असता, समितीने पाण्याचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर भूसंपादनाची कार्यवाही ५ वर्षात पूर्ण करावी असे निर्देश देऊन प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यकारी अभियंता, भीमा पाटबंधारे विभाग (पंढरपूर) यांना पाण्याचे आरक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. तथापि, अद्यापी सदर क्षेत्रासाठी पाण्याचे आरक्षण प्राप्त झाले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील आश्रमशाळेतील विदयार्थांना योग्य आहार व शुध्द पाणी मिळण्याबाबत

**(४) * ७४३१ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात एकात्मिक आदिवासी विभागांतर्गत २६ आश्रमशाळा व समाजकल्याण विभाग अंतर्गत २९ आश्रमशाळा अश्या ५५ आश्रम शाळा कार्यरत असून सदर आश्रम शाळेच्या वसतीगृहाची स्थिती दयनिय असल्याची बाब दिनांक १४ एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना योग्य आहार व शुध्द पिण्याचे पाणी मिळत नसल्यामुळे जिल्हयात बऱ्याच विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व संबंधित आश्रमशाळांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) आदिवासी विकास विभागातील प्रकल्प अधिकारी चंद्रपूर अधिनस्त एकूण १४ शासकीय व २६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत असून चंद्रपूर जिल्हयात सामाजिक न्याय विभागांतर्गत ३० विजाभज आश्रमशाळा कार्यरत आहेत. आदिवासी विकास विभागांतर्गत चालविल्या जाणा-या आश्रमशाळांमध्ये शासन निर्णयाप्रमाणे सकस व पोषक आहार दिला जातो. पिण्याचे पाणी शुद्ध राहावे यासाठी नेहमी दक्षता घेण्यात येते. पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविले जातात. विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी फिरते आरोग्य पथक आहे. तसेच प्राथमिक स्वास्थ केंद्र ग्रामीण व जिल्हा रुग्णालयामार्फत विद्यार्थ्याच्या आरोग्याची तपासणी करण्यात येते.

सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत विजाभज आश्रमशाळा कारवा ता.जि.चंद्रपूर येथील रुस्तम शिंदे याचा दिनांक ११.०४.२०१५ रोजी पोटदुखी व उलटीमुळे मृत्यू झाला असून सदर विद्यार्थ्याचा मृत्यू अशुद्ध पाण्याने झाल्याचे ग्रामीण रुग्णालयातील बल्लारपूर येथील डॉक्टरांनी प्रथम दर्शनी उपचारादरम्यान सांगितले होते. त्या अनुषंगाने सदर शाळेतील पिण्याच्या पाण्याचे नमूने जिल्हा सार्वजनिक आरोग्य शाळा चंद्रपूर येथे पाठविण्यात आले. सदर प्रयोगशाळेने पाणी नमुन्याच्या सुक्ष्मजीव अहवालात पाणी पिण्यास योग्य असल्याबाबतचे कळविले आहे. तसेच शविवच्छेदन अहवालात डॉक्टरांनी मृत्यूचे कारण विसेरा अहवालानंतरच सांगता येईल असे सांगितले.

या अनुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील सर्व विजाभज आश्रमशाळांमधील पिण्याचे पाणी तपासण्यात आले असून सर्व ठिकाणचे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत संबंधित विभागांनी प्रमाणपत्र दिलेले आहे.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील संजय गांधी निराधर योजनेत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या रक्कमेत झालेला भ्रष्टाचार**

**(५) * ६८६७ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मिळणाऱ्या रक्कमेच्या वितरणात भ्रष्टाचार होऊन, तीन महिन्यांची मिळणारी रु. १८०० रक्कम मिळाल्याच्या नोंदी खाते पुस्तकात करुन प्रत्यक्षात लाभार्थ्यांना रु. १२०० इतकीच रक्कम देण्यात आली असल्याची लेखी तक्रार दि. २७ एप्रिल, २०१५ रोजी अपंग सेवा संघाच्या आंदोलनाप्रसंगी मोर्चेकऱ्यांनी नायब तहसिलदार, उल्हासनगर श्री.विकास पवार यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर कारवाई होणे व लाभार्थ्यांना योग्य अनुदान त्वरित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना वेळेवर अनुदान प्राप्त होत नसल्याबाबत अपंग सेवा संघ यांनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी निवेदन दिले होते.

(२), (३) व (४) उल्हासनगर (जि.ठाणे) तालुक्यात आय.सी.आय.सी.आय. बँकेमार्फत बायोमेट्रीक पध्दतीने अनुदान वाटप केले जाते. वा पध्दतीत बायोमेट्रीक मशीनवर लाभार्थ्यांना बोटांचे ठसे न जुळणे, बँकेने उशीरा अनुदान वाटप सुरु करणे इ. कारणामुळे अनुदान वाटपास विलंब झाला आहे. मात्र तीन महिन्यांचे मिळणारी रु. १८०० रक्कम मिळाल्याच्या नोंदी खाते पुस्तकात करुन प्रत्यक्षात लाभार्थ्यांना रु १२०० इतकीच रक्कम दिल्याची बाब आढळून आली नाही, तथापि, यानुषंगाने लाभार्थ्यांना दरमहा वेळेवर अनुदान वाटप करण्याचे व दक्षता घेण्याचे निर्देश आय.सी.आय.सी.आय. बँकेला देण्यात आलेले आहेत.

-----------------

**राज्यात जात प्रमाणपत्र मिळवण्यासाठी जाचक असणाऱ्या अटी दूर करणेबाबत**

**(६) * ७७४९ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.धनंजय मुंडे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.राजेंद्र जैन, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्रीमती स्मिता वाघ, डॉ.सुधीर तांबे, श्री.संदिप बाजोरिया, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जात प्रमाणपत्र मिळवण्यात अडचण ठरणाऱ्या १९५० सालच्या वास्तव्याच्या जाचक अटी काढून टाकण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून १५ विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे काम प्रभावीपणे व्हावे याकरिता दि. २/३/२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र समिती कार्यान्वयीत करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जात पडताळणीसंबंधी निर्णय सहा महिन्यात न दिल्यास संबंधिताविरुध्द कारवाई करण्याचा निर्णय शासनाने दि. ११/५/२०१५ रोजी घेतला आहे तसेच प्रमाणपत्र पडताळणीच्या कामासाठी २७ नव्या अधिकाऱ्यांच्या पदनिर्मितीला राज्य शासनाने मार्च, २०१५ मध्ये मंजूरी देऊनही पदे न भरल्याने सदर काम ठप्प झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या बळकटीकरणासाठी शासनाने उपरोक्तप्रमाणे निर्णय घेतल्यानंतरही मे, २०१५ पर्यंत एकाच अध्यक्षाकडे अनेक जात पडताळणी समित्यांचा कारभार असल्याने आदिवासीच्या हजारो फाईल प्रलंबित असणे, जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विलंब होणे व त्यामुळे विद्यार्थी तसेच संबंधित गरजुंची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) जातपडताळणी नियम-२०१२ नुसार अनुसूचित जाती या प्रवर्गातील व्यक्तींना अथवा त्यांच्या कुटुंबियांना, दिनांक १०/८/१९५० रोजी वा तत्पूर्वी त्यांचा राज्यातील सर्वसाधारण रहिवासी असण्याची अट विहित करण्यात आली आहे, हे खरे आहे.

सदर नियमांनुसार आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यास जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यास कोणतीही अडचण उद्‌भवत नाही.

१५ विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांवरील कामाचा व्याप विचारात घेऊन, तसेच समित्यांचे काम प्रभावीपणे व्हावे म्हणून दिनांक २/३/२०१५ अन्वये जिल्हानिहाय समित्या स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अध्यक्ष पदासाठी अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) वा समकक्ष अधिकारी उपलब्ध न झाल्यामुळे सध्याच्या अधिका-यांकडे कार्यभार सोपवून प्रकरणे निकाली काढण्यात येत आहेत.

(४) जिल्हानिहाय समितीच्या अध्यक्षांच्या पदांसाठी अधिकारी उपलब्ध करुन देण्याबाबत महसूल विभागाकडे विनंती करण्यात आली असून समितीच्या इतर पदांसाठी पद निर्मिती प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गावरील पळस्पे ते इंदापूर रस्त्यांच्या चौपदरीकरण करताना सुप्रिमो या कंपनीने पाण्याची पाईप लाईन उध्वस्त केल्याबाबत

**(७) * ६६९० श्री.जयंत पाटील, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९९६ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा राष्ट्रीय मार्गाचे चौपदरीकरणाचे काम सुमारे गेल्या चार वर्षापासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याच्या चौपदीकरणासाठी मोठया प्रमाणात खोदकाम सुरु असुन त्यामुळे पेण तालुक्यातील निम्या अधिक गावांना पाणी पुरवठा करणारी (जि.रायगड) येथील जलवाहीनी सुप्रिमी कंपनीने उध्वस्त केली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीच्या मनमानी कारभारामुळे पेण तालुक्यातील नागरीक पाण्यापासून वंचित आहेत हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर परिसरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, अशी व्यवस्था न करण्याची कारणे कोणती ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी आवश्यक खोदकाम करतेवेळी एकूण पाच ठिकाणी जलवाहिनी खंडीत झाल्याचे निदर्शनास आले असल्याचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.
(३) महाव्यवस्थापक (तांत्रिक) व प्रकल्प संचालक, पनवेल यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार तीन ठिकाणी खंडीत झालेली जलवाहिनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांच्या मार्फत दुरुस्त करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत एका ठिकाणी जलवाहिनी दुरूस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित दुरूस्तीचे काम लवकर पूर्ण करण्याचे आश्वासन सवलतदाराने दिले आहे.
(४) व (५) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, माणगाव विभाग यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, १२ कि.मी. लांबीच्या जलवाहिन्यांचा पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून ८ कि.मी. जलवाहिन्या स्थलांतरणाचे काम पूर्ण झाले आहे व ४ कि.मी. जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याचे काम अद्याप बाकी आहे.

-----------------

## राज्यातील एम.एस्सी. कॉम्प्युटर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्याबाबत

**(८) * ८१५२ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०११-१२ पासून राज्यातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीचे अर्ज ई शिष्यवृत्ती प्रणाली मार्फत भरण्याची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. सदर प्रणालीतील काही अभ्यासक्रमांचा समावेश आहे. सन २०११-१२ पासून २०१३-१४ पर्यंत या अभ्यासक्रम प्रवेशीत विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही अशी तांत्रिक अडचण निर्माण झालेली आहे. असे मे, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खामगांव जि.बुलडाणा येथे गो.से. महाविद्यालयातील याच अभ्यासक्रमाची ३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन संगणक प्रणालीतील ही तांत्रिक अडचण दूर करुन सदर विद्यार्थ्यांस शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय,

**श्री. राजकुमार बडोले :** (१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या सद्या सुरु असलेल्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेत एस.एस्सी.कॉम्पुटरसह इतर काही अभ्यासक्रमाचा समावेश नाही. त्यामुळे सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठीच्या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही.
(२) इतर मागासवर्गीय मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एम.एस.सी. अभ्यासक्रमाच्या शिष्यवृत्ती देय नसल्याने खामगांव (जि.बुलढाणा) येथील गो.से. महाविद्यालयातील या अभ्यासक्रमात शिकणाऱ्या ३२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली नाही.
(३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मेट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत एस.एस्सी.कॉम्प्युटर व इतर सुधारित अभ्यासक्रमाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वडाळा येथील पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक कार्यालय दिल्लीत स्थलांतरीत होऊ न देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही**

**(९) * ६८७९ श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.अनंत गाडगीळ, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.शरद रणपिसे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, ॲड.अनिल परब, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा येथील पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक कार्यालय हे मुंबई येथून दिल्ली येथे स्थलांतरीत करण्याच्या केंद्र शासनाच्या दि. १८ फेब्रुवारी, २०१५ च्या निर्णयामुळे तसेच उद्योगांना ७५ परवान्या घ्यावा लागत असल्याने राज्यातील मुंबई मेटल असोसिएशनच्या २०० उद्योगांनी दिनांक १६ मे, २०१५ रोजी गुजरातमध्ये तसेच एल ॲण्ड टी इन्फ्रा कंपनीने अन्य राज्यात स्थलांतरीत होण्याचा निर्णय घेतला हे खरे आहे काय,
(२) मुंबईत आंतरराष्ट्रीय उद्योगांची मुख्यालये असल्याने हे कार्यालय दिल्ली येथे स्थलांतरीत झाल्यास राज्यातील उद्योजकांसाठी अडचणीचे ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात उद्योगांना लागणारे परवाने २२ इतके कमी केले असून आणखी कमी करण्याचा शासन प्रयत्न करणार असल्याची घोषणा मा.मुख्यमंत्री व मा.उद्योग मंत्री यांनी केली. परंतु प्रत्यक्षात मात्र याबाबतचा कोणताही आदेश अद्याप शासनाने काढलेला नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वडाळा येथील पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क महानियंत्रक कार्यालय हे तसेच मेटल बाजार व इतर उद्योग स्थलांतरीत होऊ नये म्हणून राज्य शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) मुंबईतील वडाळा येथील पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमर्क महानियंत्रक कार्यालय मुंबई येथेच कार्यान्वित आहे.

केंद्र शासनाने सदर कार्यालयात भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्याची नियुक्ती देण्याबाबत सुचीत केले आहे.

मुंबई मेटल असोसिएशन यांचे काही उद्योग गुजरात राज्यात स्थलांतरीत होत असल्याबाबतची वस्तुस्थिती नाही. तसेच एल ॲण्ड टी इन्फ्रा कंपनी अन्य राज्यात स्थलांतरीत होत असल्याबाबतचे निवेदन/प्रस्ताव विभागास प्राप्त झालेले नाही.

राज्यात विविध उद्योग/व्यवसाय सुरु करण्यासाठी आवश्यक विविध ६७ नाहरकती/परवाने कमी करुन ते सुलभ व तातडीने मिळणेसाठी मेक इन महाराष्ट्र या महत्वकांक्षी उपक्रमाद्वारे प्रयत्न करण्यात येत आहेत.

'मेक इन महाराष्ट्र' अंतर्गत Ease of doing business च्या माध्यामातून राज्यात उद्योग/व्यवसाय सुरु करण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे व उद्योग निर्मितीसाठी आवश्यक परवाने व नाहरकती सुलभ व जलद गतीने देण्यासाठी ई-व्यासपिठाचा वापर, नियमात/कायद्यात सुधारण व काही प्रक्रिया कमी करणे/फेरबद्दल करणे इत्यादी माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. उद्योगासाठी आवश्यक विविध ६७ नाहरकतीचे प्रमाण कमी करुन सद्यस्थितीत ते ४२ एवढे कमी करण्यात आले असून त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरिल चौपदीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करणेबाबत**

**(१०) * ७३९९ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ६११ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरिल चौपदीकरणाचे काम सद्यस्थिती बंद आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०१४ मध्ये विधानपरिषदेत लक्षवेधी सूचना उपस्थित केली असता सदर चर्चेच्या दरम्यान चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्याचे लेखी उत्तरात नमुद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या राष्ट्रीय महामार्गावरील मुर्तिजापूर ते मलकापूर पर्यंतच्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून मोठया प्रमाणात अपघात होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिवसेंदिवस या राष्ट्रीय महामार्गावरील वाढत चाललेल्या अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तद्नुसार सदर राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदर लांबी सुस्थितीत आहे वा सन २०१५ मधील दुरस्ती करिता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणा अंतर्गत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(४) अपघाताच्या दाखल झालेल्या गुन्हयांच्या तपास बारकाईने करण्यात येऊन निष्पन्न होणाऱ्या पुराव्याच्या आधारे कारवाई करण्यात येते, असे पोलीस अधिक्षक अकोला व बुलढाणा यांनी कळविले आहे.

(५) सदर कामाकरीता निविदाविषयक कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मार्फत प्रगतीपथावर असल्याने, राज्य सरकारने या विषयी कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद बीड व लातूर या जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागातील मोजमाप पुस्तके (मेजरमेंट बुक्स) गहाळ झाल्याबाबत

**(११) * ७५१७ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद येथील ३६४८, बीड येथील ११८९ गहाळ होऊन ३२६ पुस्तिका जमा करण्यात आल्या तसेच लातूर येथील लहान ४१० आणि मोठ्या ३०१ मोजमाप पुस्तिका (मेजरमेंट बुक्स) गहाळ झाल्याचे दिनांक १५ मे, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मोजमाप पुस्तके गहाळ झाल्याने या कामात कोट्यवधी रुपयाचा गैरव्यवहार झाला असल्याची शक्यता निर्माण झाली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, संबंधित ठेकेदार व मजूर संस्था यांच्याकडून या मोजमाप पुस्तके जमा करण्याबाबत तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील यात दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

तथापि सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद येथील १५४३, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड येथील ७९६, सार्वजनिक बांधकाम विभाग, लातूर येथील ४७० मोजमाप पुस्तिका मोजणीसाठी उपलब्ध झाल्या नाहीत. मोजमाप पुस्तिका त्वरित मोजणीसाठी सादर करण्याबाबत संबंधित उप अभियंता/कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/कर्मचा-यांना सूचित करण्यात आले आहे.

(२) मोजमाप पुस्तिकांचा आढावा घेण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. तसेच यामुळे गैरव्यवहार झाल्याची शक्यता नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अपंगांच्या विशेष शाळांमधील अर्धवेळ कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचनेनुसार वेतन मिळण्याबाबत**

**(१२) * ८०८२ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या अपंगांच्या शाळांमधील शिक्षकांना शासनाने दि. ४ डिसेंबर, २००९ च्या आदेशान्वये ६ व्या वेतन आयोगाची वेतन संरचना लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंगांच्या शाळांमधील अर्धवेळ कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेनुसार वेतन अदा केले जात होते हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ६ व्या वेतन आयोगात या अर्धवेळ कर्मचाऱ्यांना सुधारित वेतन संरचनेपासून वंचित ठेवले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अपंग कल्याण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. २३ मे, २०११ च्या पत्रान्वये अर्धवेळ कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, अद्यापही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) अर्धवेळ कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना लागू करण्यात आलेली नाही, हे खरे आहे.

(४) होय.

(५) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**राज्यात विविध उद्योग उभारण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी केलेला अभ्यास दौरा**

**(१३) * ७०३० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध उद्योग उभारण्यासाठी अर्थसहाय्य/गुंतवणूक उपलब्ध व्हावी या उद्देशाने गत अधिवेशन समाप्त झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री यांनी अनेक परदेश दौरे केले व त्यात परदेशातील अनेक उद्योग व्यवस्थापनांशी महत्वपूर्ण करार केले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांच्या उक्त परदेश दौऱ्यांचा तपशील व त्यावेळी परदेशातील उद्योग व्यवस्थापनांशी केलेल्या करारांचा तपशील काय आहे,

(३) उक्त करारांचा लाभ राज्यास मिळावा यासाठी राज्य शासनामार्फत कोण-कोणती व्यवस्था/यंत्रणा उभारली आहे व प्रत्यक्षात या करारांनुसार सदरचा लाभ केव्हापासून मिळणे अपेक्षित आहे,

(४) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) राज्यात विविध उद्योग उभारणीसाठी परदेशी गुंतवणूक व्हावी या उद्देशाने मा. मुख्यमंत्री यांनी केलेल्या दोऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ) आतंरराष्ट्रीय उद्योग मेळावा व्हॅनोव्हर जर्मनी दिनांक १३ ते १६ एप्रिल, २०१५.

ब) कृषी तंत्रज्ञान परिषद, तेल अविव, इस्त्रायल दिनांक २६ ते २९ एप्रिल, २०१५.

क) महाराष्ट्र इन्व्हेस्मेंट प्रमोशन सेमिनार, चीन दिनांक १४ मे १८ मे, २०१५.

ड) दुबई दौरा दिनांक १३ ते १४ जून २०१५.

इ) महाराष्ट्र परिषद लॉस एँजल्स, अमेरिका दिनांक २९ जून ते ८ जुलै.

गुंतणूकदारांना दिलेले देकारपत्र/सामंजस्य करारबाबत तपशील खालील प्रमाणे आहे.

१) हॅनओवर-जर्मनी, येथे मे. एस.क्यु.एस. जर्मनी (सॉफ्टवेअर कं.) यांना उद्योग विस्ताराकरिता राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान पार्क, हिंजवडी पुणे येथे ८००० चौ.मी. देण्याबाबत देकारपत्र महामंडळा मार्फत देण्यात आले.

२) मे. हाय्यर, चीन यांच्या रांजणगांव, पुणे येथील उद्योगाला विशाल प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला याबाबतचे देकारपत्र मे. हाय्यर कंपनीला चिंगडाऊ, चीन येथे राज्यशासना मार्फत देण्यात आले. तसेच महाराष्ट्रातील औरंगाबाद व चीन मधील डुंगहॉंग या दोन शहरात भगीनी शहर (sister city) बाबत सामंजस्य करार करण्यात आला.

(३) विकास आयुक्त (उद्योग) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व शासनाच्या उद्योग विभागाकडून सदर देकारपत्र/सामंजस्य करार यांचा लाभ मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांच्या कार्यालयात बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व इतर साधने वाटप करताना झालेला गैरव्यवहार**

**(१४) * ७४७७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांच्या कार्यालयाकडून बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व उपसाधने वाटप करण्याकरीता बचत गटांची दि. २१ एप्रिल, २०१५ रोजी निवड करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस नोंदणी प्रमाणपत्र व इतर बनावट कागदपत्रे देवून काही बचत गटांची निवड करण्यात आल्याची बाब तक्रारदाराने दि. १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिधिंनी दि. २५ मे, २०१५ रोजी पत्र देवून प्रकरणाची चौकशी करुन दोषीविरुध्द गुन्हे दाखल करण्याची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बनावट प्रस्ताव देवून शासनाची फसवणुक करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नोंदणी नसलेले बचत गट व बनावट कागदपत्र असलेले किती प्रस्ताव शासनाच्या निदर्शनास आले आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) तक्रारदार श्री. राजेश बनसोडे , वासनवाडी (बीड) यांनी माहितीच्या अधिकारात आयुक्तालयाकडे निवेदन दिले. सदरील माहिती सहायक आयुक्त, बीड यांचे कडुन प्राप्त करुन घेणेबाबत तक्रारदारांना आयुक्तालयाकडुन कळविले आहे.

(३), (४) व (५) सहायक आयुक्त, समालकल्याण, बीड यांचेकडे ६६ अर्ज प्राप्त झाले. गट विकास अधिकारी, पंचायत समिती , बीड यांचे कडुन अधिकारी, पंचायत समिती, बीड यांचे कडुन तपासणी केली असता त्यातील ५५ नोंदणीकृत असुन ५ बचत गटांची नोंदणी केली नसल्याचा अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार ५ बचत गटांची निवड रद्द करण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील अपंग शाळांतील शारीरिक शिक्षक निदेशकांना बी.एड्. समकक्ष (बी.पी.एड्.) वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(१५) * ७६८९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंध, मतिमंद, अस्थिव्यंग व मूकबधीर या प्रवर्गाच्या अपंग शाळांतील विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षण देण्याचे काम करीत असलेल्या शारीरिक शिक्षक निदेशक यांना बी.एड्. समकक्ष (बी.पी.एड्) वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा अहवाल आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या अहवालावर काय निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, त्यामागची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागातील रिक्त पदांवर तासिका व रोजंदारी पध्दतीवर काम करणाऱ्या शिक्षकांना नियमित सेवेत घेण्याबाबत

**(१६) * ७३०६ श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.रामनाथ मोते, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातील रिक्त पदांवर तासिका व रोजंदारी पध्दतीवर काम करणाऱ्या शिक्षकांना नियमित सेवेत घेण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशन २०१५ मध्ये लक्षवेधी क्र. ३५३ अन्वये आदिवासी विभागात रोजंदारी व तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल असे उत्तरात नमूद केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय व केव्हापर्यंत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आंदोलनकर्त्यांची मागणी ही धोरणात्मक बाब असल्याने शासन स्तरावर निर्णय घेतल्यानंतरच रोजंदारी/तासिका पद्धतीने कार्यरत कर्मचा-यांना नियमित सेवेत दाखल करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे अर्थसंकल्पिय अधिवेशन २०१५ च्या लक्षवेधी क्र.३५३ मध्ये नमूद केले होते.

(२) व (३) रोजंदारी/कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा नियमित करणे ही बाब सर्व मंत्रालयीन विभागांशी संबंधित असून या बाबीवरील धोरणात्मक निर्णय एकत्रितपणे होणे आवश्यक आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून एकत्रितपणे घेण्यात येणा-या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज व वीज बील माफ करणेबाबत**

**(१७) * ७२४८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.हरिसिंग राठोड, श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक २७८७ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थती लक्षात घेता शेतकऱ्यांची संपुर्ण कर्ज माफी व पुर्ण वीज बिल माफी करण्याबाबतच्या मागण्या राज्यातील सामाजिक राजकीय संघटनासह शेतकऱ्यांनी आंदोलने व निवेदनाद्वारे करुन शासनाचे लक्ष वेधले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची संपुर्ण कर्ज माफी व वीज बील माफी करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, दुष्काळाची तिव्रता लक्षात घेता अत्यल्प आर्थिक मदत व केवळ वीज बिलावरील व्याज माफ करुन शेतकऱ्यांची बोळवण करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांकडून संताप व नाराजी व्यक्त होत आहे काय,

(४) असल्यास, संपुर्ण कर्ज माफी व वीज बील माफी बाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकाराकडून घेतलेले कर्ज माफ करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दुष्काळग्रस्त गावातील कृषी ग्राहकांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, २०१४ या त्रैमासिकाची वीज देयके संपुर्णपणे माफ करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) संपूर्ण कर्ज माफीची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**अमरावती प्रादेशिक कार्यालयात मऔविम अमरावती अंतर्गत औद्योगिक भूखंड वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(१८) * ७१२३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.राजेंद्र मुळक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती प्रादेशिक कार्यालयात मऔविम अमरावती अंतर्गत औद्योगिक भूखंड वाटपात मोठया प्रमाणात अनियमितता झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंडाचे वाटप करण्यासाठी स्थानिक भूखंड वाटप समिती व महामंडळाच्या मुख्यालय स्तरावर भूखंड वाटप समिती गठीत करण्यात आली असून सदर समिती भूखंडांसाठी प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने बैठक आयोजित करुन भूखंड वाटप करण्यासंबंधीचा निर्णय घेतात. त्यामुळे अमरावती येथे भुखंड वाटपामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार (जि.ठाणे) भागात मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अपघातात झालेली वाढ**

**(१९) * ६९७० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार (जि.पालघर) भागात मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्त्यांच्या कामात नियोजन नसल्याने तसेच महामार्गावरील पथदिवे बंद असल्याने सुसाट जाणाऱ्या वाहनांमुळे सदर रस्त्यावर अपघातांच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कार्यवाही करण्यासाठी स्थानिक संघटनांनी दिनांक ११ मे, २०१५ रोजी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने या भागातील रस्ते अपघात रोखण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशतः खरे आहे.
(२) होय.
(३) सुरक्षिततेच्या दृष्टीने सूचनाफलक, ब्लिंकर्स लावण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील मुकबधिर विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२०) * ६८१२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनामार्फत मुकबधीरांसाठी १० वी पर्यंतच शाळा चालविल्या जात असल्याने त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बाबींची चौकशी शासनामार्फत करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुकबधीरांसाठी उच्च शिक्षण सुलभतेने उपलब्ध करण्यासाठी शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत अपंगाकरीता इयत्ता १० वी पर्यंतच्या विशेष शाळा कार्यरत आहेत. तथापि, मुकबधिर विद्यालय, शंकरनगर, नागपूर व श्री. सदगुरु साईबाबा सेवा ट्रस्ट संचालित श्री. सी.आर. रंगनाथन निवासी कर्णबधिर विद्यालय पुणे या विद्यालयात कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी इयत्ता ११ वी, इयत्ता १२ वीचे उच्च माध्यमिक वर्ग सुरु असून यास शिक्षण विभागाने विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेली आहे. अंध, अधुद्दष्टी, कृष्ठरोगमुक्त, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मतिमंद व मनोरुग्ण विद्यार्थी इयत्ता १० वी नंतरचे महाविद्यालयीन शिक्षण सामान्य मुलांबरोबरच घेत आहेत. तसेच व्यवसायिक, तांत्रिक व अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या दर्जाप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच सर्व अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क, प्रकल्प टंकलेखन खर्च, अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील कर्मचाऱ्यांना त्याच वसाहतीत माफक दरात भूखंड उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२१) * ६७५१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वांद्रे (पूर्व) येथील ९७ एकर क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या शासकीय वसाहतीतील इमारतींचे बांधकाम सुमारे ४० ते ५० वर्ष जुने असून सदर इमारती अत्यंत जीर्ण अवस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) सदर इमारती असलेल्या वांद्रे (पूर्व) येथील सर्व्हे क्र ३४१ भुमापन क्र ६२९ पैकी या जमिनीवरील शासकीय वसाहतीचा पुनर्विकास करुन माफक दरात मालकी तत्वावर घरे किंवा घरांसाठी माफक दरात भूखंड देणेबाबत शासनाकडे रहिवाश्यांनी सातत्याने आंदोलने, मोर्चे व दिनांक १६ डिसेंबर, २०१४ व १८ मे, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेने यापूर्वीही दिनांक २७ ऑगस्ट, २००७ रोजी तात्कालिन मा.मुख्यमंत्री गव्हर्नमेंट क्वार्टर्स रेसिडंस असोशिएशनच्या माध्यमातून शासकीय वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव देखील सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांना माफक दरात भूखंड उपलब्ध करुन दिल्यास सुमारे ३००० कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कायमस्वरुपी निवासस्थान उपलब्ध होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) याबाबत कर्मचाऱ्यांनी काही वेगळया योजना/ प्रस्ताव दिले किंवा गृहनिर्माण सोसायटया स्थापन केल्या तर सकारात्मक विचार करण्यात येईल असे आश्वासन शासनाकडून मिळाल्यानंतर दिनांक १५ मार्च, २०१० रोजी वर्ग-१ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांसाठी सरकारी गृहनिर्माण संघीय संस्था स्थापन करुन सदर संस्थेमार्फत तत्कालिन महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना सविस्तर प्रस्ताव सादर करुन भूखंडाची मागणी केली असता, सदर प्रस्तावाचा विचार न करता शासनाने बी.ओ.टी. तत्वावर वसाहतीच्या पुनर्विकास करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांना हक्काचे घर देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सदर विषय विशेष गृहनिर्माण विभाग व महसुल विभागाशी संबंधित आहे.

(३) सदर विषय महसुल तथा नगर विकास विभागाशी संबधित आहे.

(४) सदर विषय महसुल विभागाशी संबंधित आहे.

(५) सदर विषय सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याबाबत**

**(२२) * ८२३६ श्री.राजेंद्र जैन, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या विमुक्त समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्याच्या हेतूने राज्य शासनाने राज्यात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेची घोषणा होऊन चार वर्षाचा कालावधी होऊनही एकाही गावात भटक्या विमुक्त समाजातील लोकांची वसाहत निर्माण झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील योजना केव्हा राबविण्यात येणार आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.
(२) नाही.

आतापर्यंत आठ वसाहतींसाठी मंजूरी दिलेली असून लातूर जिल्ह्यात २ वसाहतींचे काम पूर्ण होऊन त्या लाभार्थ्यांना हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत.
(३) या योजनेसाठी शासन निर्णयामधील निकषानुसार २० कुटुंबासाठी १ वसाहत निर्माण केली जाते. त्यासाठी विहित केल्याप्रमाणे कुटुंबाची व जागेची उपलब्धता होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) परिसराच्या विकास आराखड्याबाबत**

**(२३) * ७७०८ श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) हा केंद्रबिंदू मानून या शहर व परिसराच्या विकासासाठी उद्योग क्षेत्रात एक लक्ष कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल शहर व आजुबाजूच्या परिसरात उद्योगाच्या दृष्टीने कोणकोणत्या योजना/कामे हाती घेण्यात येणार आहेत तसेच त्यानुसार योजना व कामाचा आराखडा तयार करण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, सदर आराखडा तयार करण्याचे काम किती कालावधीत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सायन-पनवेल महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(२४) * ७१५८ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन-पनवेल महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम अपुर्णावस्थेत असल्याने पनवेल (जि. रायगड) येथील कोपरा खाडी पूलावर होत असलेले अपघात त्यामुळे सदरील खाडी पूलाला धोका निर्माण झाला असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सायन-पनवेल महामार्गाचे काम पुर्ण करण्याबाबत व सदरील पुलावरील अपघात रोखण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिकमधील आदिवासी विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी ऑनलाईन भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(२५) * ७१०४ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मधील आदिवासी विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी ऑनलाईन भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या भरती प्रक्रियेसंदर्भात सखोल चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास महामंडळाच्या अखत्यारीतील पदांच्या भरती प्रक्रियेबाबत शासनस्तरावर तक्रारी प्राप्त झालेल्या असून, वृत्तपत्रांमध्ये यासंबंधीच्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत, ही बाब खरी आहे.

(२) व (३) सदर भरती प्रक्रियेसंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन अहवाल शासनास सादर करणेबाबतच्या सूचना आदिवासी विकास महामंडळास शासनपत्र दिनांक ०३.०२.२०१५ व दिनांक २१.०५.२०१५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आदिवासी विकास महामंडळाने दिनांक ११.०६.२०१५ रोजीच्या आदेशान्वये अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेमार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी महामंडळास सादर केलेला चौकशी अहवाल महामंडळामार्फत दिनांक ०६.०७.२०१५ च्या पत्रान्वये दिनांक ०७.०७.२०१५ रोजी शासनास प्राप्त झालेला आहे. सदर अहवालानुसार भरती प्रकरणी अनियमितता किंवा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

-----------------

**महाड औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी चोचिंदे या गावाजवळ फुटल्याने शेतीचे झालेले नुकसान**

**(२६) * ८३१३ श्री.अनिल तटकरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील सांडपाणी वाहून नेणारी वाहिनी दिनांक २३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास चोचिंदे या गावाजवळ फुटल्याने सांडपाणी परिसरातील शेतात शिरल्याने शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय,

(३) अद्याप नुकसान भरपाई देण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) महाड औद्योगिक वसाहतीमधील चोचिंदे या गावाजवळ महामंडळाची सांडपाणीवाहिनी दि.२२/४/२०१५ रोजी रात्रौ ८.३० वा. फुटल्यामुळे सांडपाणी वाहिनीजवळच्या ५ शेतांमध्ये पसरले होते. तथापि, शेतामध्ये पिके नव्हती. परंतु, शेतकऱ्यांच्या शेतजमीनीचे नुकसान सांडपाणी शेतात घुसल्यामुळे झाल्याने नुकसानीचा पंचनामा तलाठी, शिरगाव यांच्यामार्फत करण्यात आला असून जमिनीच्या नुकसानीबाबत उचित कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल सादर करण्याबाबत तहसिलदार, महाड यांनी दि.२३/४/२०१५ रोजी तालुका कृषी अधिकारी, महाड यांना कळविले आहे.

-----------------

**समाजकल्याण विभागामार्फत जी.डी.आर्ट विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत**

**(२७) * ८१९७ श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१३-१४ पर्यंत जी.डी.आर्ट विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागामार्फत शिष्यवृत्ती मिळत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४-१५ मध्ये संबंधीत विद्यार्थ्यांकडून अद्यापपावेतो शिष्यवृत्ती फार्म भरुन घेतले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याविषयी शासनाची भुमिका काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) जी.डी.आर्ट या अभ्यासक्रमात शिकणा-या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. तथापि, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या सद्या सुरू असलेल्या शिष्यवृत्ती योजनेत या अभ्यासक्रमाचा समावेश नसल्याने शिष्यवृत्तीचा लाभ दिला जात नाही.

(२) सदर अभ्यासक्रमामध्ये शिकणा-या अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज स्विकारले जात असून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती देय नसल्याने अर्ज स्विकारले जात नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कन्नड, (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) शहरातील हिवरखेडा-गौताळा रस्त्याची रुंदी वाढविणे तसेच रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही**

**(२८) * ७२१६ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नड (जि.औरंगाबाद) शहरातील हिवरखेडा-गौताळा रस्त्याची पुर्णत: वाताहत झाली असून अरुंद रस्ते व ठिकठिकाणी पडलेल्या खड्डयांमुळे वाहनांसह, पादचाऱ्यांनाही या रस्त्याने चालणे कठीण झाले असून, या रस्त्यालगतच ग्रामीण रुग्णालय असल्याने रुग्णांना याच खराब रस्त्यावरुन रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते विशेषत: या रुग्णालयात प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांना खूप यातना होतात. काही महिन्यापूर्वी एक महिला तर खड्डयामुळे रस्त्यातच प्रसूत झाली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांची रुंदी वाढविणे, रस्त्यावरील खड्डे बुजवणे तसेच रस्ता दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर रस्त्याचा पृष्ठभाग खराब झालेला आहे हे खरे आहे. तथापि रस्ता खराब असल्यामुळे महिला रस्त्यात प्रसुत झाली अशाप्रकारची कोणतीही तक्रार या विभागास प्राप्त नाही.

(२) व (३) निधीच्या उपलब्धतेमुळे रस्त्याची दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**राज्यातील शेतकऱ्यांना गत हंगामातील कापूस व धान पिकाची नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(२९) * ८००३ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत हंगामातील कापूस व धान पिकाचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार मदत देणेबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) नाही, तथापि शासन पत्र दिनांक ०५/०१/२०१५ अन्वये केंद्र शासनाकडे रु. ६०१३.२८ कोटी इतक्या रकमेचे मदतीचे ज्ञापन पाठविण्यात आले होते. शासन निर्णय दिनांक ०७/०१/२०१५ व दिनांक ०२/०२/२०१५ अन्वये खरीप हंगाम २०१४ मधील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित शेतकऱ्यांना रु. ४०००/- कोटी व रब्बी हंगाम २०१४-१५ मधील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या बाधित शेतकऱ्यांना रु. ३६४.२७ कोटी इतक्या निधीचे (Input Subsidy) वाटप करण्यात आले आहे. यामध्ये कापूस, धान व विविध पिकांचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडबंदर (जि.ठाणे) येथील हनुमान नगर मधील कब्रस्तानच्या बाजूला एम.आय.डी.सी.च्या जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(३०) * ७६४२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील देवी प्रभाग समितीमधील हनुमान नगर येथे कब्रस्तानाच्या बाजूला एमआयडीसीच्या जागेवर अतिक्रमण सुरु असून त्याकडे संबंधित विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०१५ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत अनेक राजकीय पक्षांनी संबंधित विभागाकडे तक्रारी केल्या असतानाही उक्त अतिक्रमण अद्याप हटविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने सदरील जागेवरील अतिक्रमण त्वरित हटविण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, सदर अतिक्रमण हटविण्याबाबतची कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील देवी प्रभाग समितीमधील हनुमाननगर येथे कब्रस्तानच्या बाजूला वागळे औद्योगिक क्षेत्र असून तेथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मालकीचा भूखंड क्र. ओएस-१६ आहे. त्यावर अतिक्रमण झालेले असल्यामुळे महामंडळाने संबंधितास दि. ११/५/२०१५ व दि. १०/६/२०१५ रोजी नोटीस बजावून अतिक्रमण थांबविण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) महामंडळाने मा.उच्च न्यायालयाने अतिक्रमण झालेल्या जागेच्या संदर्भात दिलेल्या आदेशानुसार हनुमाननगर टेकडी, कब्रस्तानसमोर व त्याच्या आजुबाजूच्या परिसरातील भूखंड व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी मोहिम हाती घेण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्रीनगर पोलीस स्टेशन, श्रीनगर वागळे इस्टेट, ठाणे यांना दि. २२/६/२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जोगेश्वरी (प) एस.व्ही.रोड येथील मंजेरजी बनाजी या अंध विदयार्थी वसतिगृहातील मुलांवर होत असलेल्या अत्याचाराबाबत

**(३१) * ७०६२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी (प) एस.व्ही.रोड येथील मंजेरजी बनाजी अंध विदयार्थ्याच्या वसतिगृहातील मुलांना वाईट वागणूक दिली जात असून मुलांचे जेवण बंद करण्यात आले असल्याचे तसेच कामगारांना स्वच्छतागृह साफ करु नये असे सांगण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये येथील विदयार्थ्यानी मा. समाजकल्याण मंत्री यांच्या प्रत्यक्ष भेटीत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतिगृहातील विदयार्थ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) शासनाच्या दिनांक ५.५.२०१५ च्या आदेशान्वये सदर कर्मशाळेवर शासनामार्फत प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात एचआयव्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना ५ टक्के जागा राखीव ठेवण्याबाबत

**(३२) * ६८१५ श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात एचआयव्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना ५ टक्के जागा राखीव ठेवण्याचा प्रस्ताव दि. २४ नोव्हेंबर, २०१३ रोजी समाजकल्याण आयुक्त (पुणे) यांनी आपल्या शिफारशींसह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींची चौकशी शासनाव्दारे करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, कार्यवाहीस होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रस्तावानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत शासकीय वसतिगृहामध्ये एचआयव्ही ग्रस्त विद्यार्थ्यांना जागा राखीव ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोपरी ठाणे (पूर्व) येथील रेल्वे पुलाचे काम सन २००५ पासून सुरु होऊनही अद्याप पुर्ण न झाल्याबाबत

**(३३) * ७५४१ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरी, ठाणे (पूर्व) येथील रेल्वे मार्ग ओलांडण्यासाठी असलेल्या महामार्गावरील पुलाच्या चौपदरी रस्त्याचे रुंदीकरण करण्याच्या कामाचा सन २००५ मध्ये प्रत्यक्षात अंदाजित खर्च रक्कम रुपये ९ कोटी रुपये इतका होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ पासून ते आजतागायात सदर पूलांचे काम सुरु न करण्यात आल्यामुळे या कामाचा खर्च रूपये ९० कोटीवर गेला असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी स्थानिक नागरिकांनी संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे, मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्व.उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा तसेच अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचेकडे माहे एप्रिल, २०१५ च्या दुसऱ्या आठवडयात तक्रार-निवेदने देऊनही अद्याप याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामाचा खर्च ९ कोटीवरुन ९० कोटीवर जाण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास त्यामध्ये काय आढळून आले व तद्नुसार संबंधिताविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली अथवा येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सन २००१ मध्ये कोपरी पूलाच्या दोन्ही बाजूस २ + २ मार्गिकेकरीता फक्त रुदींकरणासाठी प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकाची रक्कम रु. ९ कोटी होती.

(२) अंशत: खरे आहे.

रेल्वे विभागाकडून सर्वसाधारण मांडणी नकाशास दिनांक १५ एप्रिल, २०१५ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने कामाची किंमत रु. ११३.७४ कोटी इतकी येते या रक्कमेचे सुधारीत अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) निवेदन प्राप्त नाही.

(४) सदर कामाची किंमत रु. ९ कोटीवरुन रु ११३.१४ कोटी इतकी झाली आहे. सदर वाढ प्रामुख्याने सन २००० ते २०१५ या दरम्यान झालेली भाववाढ, रेल्वेचा सूचनेप्रमाणे जून्या पूलाची उंची वाढवण्याचे काम प्रकल्पात समाविष्ठ केल्याने कामाची किंमत वाढली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गडचिरोली येथे सर्च सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षणानुसार येथील अनेक गावांमधील आदिवासींचे दारु, तंबाखू या व्यवसनामुळे मृत्यू होत असल्याबाबत**

**(३४) * ८६९३ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली येथील सर्च या सामाजिक संस्थेने ८६ गावांमधील सर्वेक्षणातून असे निदर्शनास आले आहे की, येथील आदिवासींमध्ये दारु, तंबाखू यांच्या वाढत असलेल्या व्यसनामुळे ३५ ते ४५ वयोगटातील आदिवासींचे अकाली मृत्यू होत असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली येथील होणारे आदिवासींचे अकाली मृत्यूला आळा बसण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

सदर संस्थेने सहसंचालक आरोग्य विभाग, नागपूर यांच्याकडे अहवाल दिला आहे.

(२) व (३) समाजामध्ये व्यसनाधीनते पासून परावृत्त करण्यासाठी वेगवेगळ्या कार्यक्रमामार्फत जन जागृती करण्यात येते. सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २९/०३/२०१३ च्या शासन निर्णयान्वये व्यसनाधीन व्यक्तींचे/ रुग्णांचे पुनर्वसन व त्यांच्यावर उपचार करण्यासाठी, व्यसनमुक्ती केंद्रांना अर्थसहाय्य करणारी महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुनर्वसन केंद्र या योजना राबविण्यात येतात. त्यानुषंगाने प्रत्येक महसुली विभागास दोन या प्रमाणे व्यसनमुक्ती क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या १२ संस्थांना अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेतला आहे.

-----------------

## राज्यातील पंधरा हजारापेक्षा अधिक पतसंस्थांमधील ठेवींना विमा संरक्षण देण्याबाबत

**(३५) * ८८२४ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पंधरा हजारापेक्षा अधिक पतसंस्थांमध्ये कोटयवधी रुपयांच्या ठेवी असून त्यांना विमा संरक्षण नसल्याने पतसंस्था अडचणीत आल्यास ठेवीदारांची रक्कम बुडण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे, मे २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कारणास्तव सदरहू पतसंस्थांनी विमा संरक्षण नसल्याचे स्पष्टीकरण ठेवीदारांच्या पासबुकात व पावतीवर लेखी नोंदवावे तसेच सह संस्थेच्या आर्थिक उलाढालीचा तपशीलही कार्यालयात फलकावर नोंद करावा असा आदेश सहकार आयुक्तांनी दिला आहे परंतू याबाबत उचित कार्यवाही अद्यापही करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे,

(२) व (३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी दि. २९.११.२०१४ च्या परिपत्रकान्वये क्षेत्रीय कार्यालयांना असे निर्देश दिले आहेत की, सहकारी संस्थामध्ये ठेवलेल्या ठेवीस विमा संरक्षण नसल्याचे ठेवीदारांना देण्यात येणाऱ्या ठेव पावतीवर “सदरच्या ठेवीस कोणतेही विमा संरक्षण नाही” असा उल्लेख करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक शाखेच्या दर्शनी भागात संस्थेच्या संचालक मंडळाची नावे, त्यांचा कालावधी , लेखापरिक्षणाची वर्गवारी, सी.डी. रेश्यो गुंतवणुकीचा तपशील, मागील वर्षाची वसुली, एन.पी.ए.चे प्रमाण, शेवटच्या सर्वसाधारण सभेचा दिनांक, मागील तीन वर्षा अखेरची नफा तोटा रक्कम

त्याचप्रमाणे संस्थेचे व्यवस्थापक/मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नाव याबाबतचा तपशील असलेला बोर्ड ठळक अक्षरात लावण्यात यावा.

सदर निर्देशाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदूर रेल्वे (जि.अमरावती) धामणगाव येथून एम.एस.आर.डी.सी. अंतर्गत औरंगाबाद-वर्धा एक्सप्रेस हायवेवर मोठयाप्रमाणात खड्डे पडल्याबाबत

**(३६) * ८८७१ श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि. अमरावती) धामणगाव येथून एम.एस.आर.डी.सी. अंतर्गत औरंगाबाद-वर्धा एक्सप्रेस हायवेवर मोठया प्रमाणात खड्डे पडलेले असल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याने याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ मे, २०१५ रोजी मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अर्थसंकल्पिय अधिवेशन, २०१५ मध्ये विभागाच्या चर्चेदरम्यान मा सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी तातडीने खड्डे बुजविण्यात येतील असे सभागृहात आवश्वासन देऊनही अद्यापपर्यंत खड्डे बुजविण्यात आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता माहे एप्रिल, २०१५ मध्ये प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात घेण्यात आला. ताब्यात घेण्यात आलेल्या एकूण ७६.९० कि.मी. लांबीपैकी ४५.९० कि.मी. लांबीत खड्डे पडले होते. सदर खड्डयांची तात्पुरती दुरूस्ती पावसाळ्यापूर्वी करुन रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली आहे.

रस्ता सुधारण्याची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील एसटी को. ऑप बँकेच्या निवडणूकीत थकबाकीदार सभासदांना मतदानापासून वंचित ठेवल्याबाबत

**(३७) * ८९७१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील एसटी को. ऑप बँकेच्या निवडणूकीतील सुमारे २५ हजार सभासद थकबाकीदार असल्याने त्यांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बँकेच्या कारभारातही मान्यताप्राप्त संघटनेच्या अधिकाऱ्यांनी अनेक घोटाळे केले असून त्याबद्दल मुंबई उपनिबंधकांच्या अहवालात तत्कालीन संचालकांना दोषी ठरविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही, तथापि, नाशिक जिल्ह्यातील स्टेट ट्रान्सपोर्ट को. ऑप बँक लि. मुंबई या बँकेच्या सभासदांची संख्या ५,३३५ असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ क अ मधील तरतुदीनुसार १४३ इतके सभासद थकबाकीदार असल्यामुळे अपात्र ठरले आहेत.

(२) सदर बँकेच्या कामकाजाबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या दि. २३.०५.२०१३ च्या पत्रान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये संगणक सॉफ्टवेअर प्रणाली खरेदीमध्ये रु. १०.३८ लाख इतके आर्थिक नुकसानीबाबत चौकशी करण्याचे आदेश पारित केले होते. सदर आदेशाच्या अनुषंगाने चौकशी अधिकाऱ्यांनी सहकार आयुक्त व निबंधक यांना दि. १५.०१.२०१४ रोजी सादर केलेल्या चौकशी अहवालात सदर खरेदीत कोणासही जबाबदार धरले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आदिवासी विकास विभागात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत.**

**(३८) * ९०९२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागात सन २००४ ते २००९ मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने आयोग नेमला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आयोगाच्या चौकशीचे कामकाज पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय
(४) असल्यास, त्याचा थोडक्यात तपशील काय आहे, व सदर अहवालानुसार भ्रष्टाचारामध्ये दोषी असलेल्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) अद्याप, सदर आयोगाची चौकशी पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) मा. श्री.एम.जी. गायकवाड, सेवानिवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे.
(२), (३) व (४) नाही. शासन निर्णय दिनांक १३.४.२०१५ अन्वये चौकशी समितीस मुदतवाढ दिलेली असून सद्यस्थितीत चौकशी समितीचे कामकाज सुरु आहे.
(५) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार चौकशी समितीचे काम सुरु असून सध्या प्राप्त तक्रारकर्त्यांच्या शपथपत्रावरील सुनावणी व साक्षीदार तपासणीचे कामकाज सुरु आहे.

-----------------

**कारवा (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी दूषित पाणी प्याल्याने एका विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू**

**(३९) * ९४२४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल तटकरे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारवा (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील आश्रमशाळेतील तब्बल ४० विद्यार्थ्यांनी जीर्ण अवस्थेतील विहिरीतील पाणी प्याल्यामुळे एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

सामाजिक न्याय विभागांतर्गत चंद्रपूर जिल्हयात ३० विजाभज आश्रमशाळा कार्यरत आहेत. त्यापैकी विजाभज आश्रमशाळा कारवा, ता.जि.चंद्रपूर येथील गणेश रुस्तम शिंदे विद्यार्थ्यांचा दि. ११.०४.२०१५ रोजी पोटदुखी व उलटीमुळे मृत्यू झाला असून सदर विद्यार्थ्यांच्या मृत्यू अशुध्द पाण्याने झाल्याचे ग्रामीण रुग्णालयातील बल्लारपूर येथील डॉक्टरांनी प्रथम दर्शनी उपचारा दरम्यान सांगितले होते. त्या अनुषंगाने सदर शाळेतील पिण्याच्या पाण्याचे नमुने जिल्हा सार्वजनिक आरोग्य केंद्र, चंद्रपूर येथे पाठविण्यात आले. सदर प्रयोगशाळेने संबंधित आश्रमशाळेच्या पाणी नमुन्याच्या सुक्ष्मजीव अहवालात सदरील पाणी पिण्यास योग्य असल्याबाबतचे कळविले आहे. तसेच शवविच्छेदन अहवालात डॉक्टरांनी मृत्यूचे कारण विसेरा तपासणी नंतरच निश्चित होईल.
(२) सदर विद्यार्थ्यांच्या विसेरा तपासणी करिता नागपूर येथील प्रयोगशाळा पाठविल्याचे पोलीस निरिक्षक बल्लारपूर पोलीस स्टेशन यांनी सांगितले आहे. अद्याप अहवाल अप्राप्त असल्याने मृत्युचे कारण स्पष्ट झालेले नाही.
(३) चंद्रपूर जिल्हयातील सर्व विजाभज आश्रमशाळांमधील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासुन घेतलेले आहे व सदर शाळांमधील पिण्याचे पाणी पिण्यास योग्य असल्याबाबत संबंधित विभागाने प्रमाणपत्र दिलेले आहेत. तसेच सर्व विजाभज आश्रमशाळांना पिण्याच्या पाण्यासाठी युव्ही फिल्टर बसविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या ४३७ उमेदवारांपैकी २५ उमेदवारांनी आदिवासी असल्याची बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याबाबत**

**(४०) * ९५३९ डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या ४३७ उमेदवारांपैकी २५ आदिवासी उमेदवारांचे प्रमाणपत्र बनावट असल्याचे पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने माहे एप्रिल-मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द व बनावट प्रमाणपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त बनावट प्रमाणपत्र सादर करणाऱ्या २५ उमेदवारांच्या जागांवर योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांचे दिनांक १५ एप्रिल, २०१५ च्या पत्रानुसार आदिवासी विभागाने दिनांक २१ एप्रिल, २०१५ अन्वये पाठविलेल्या पत्राच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे निवड झालेल्या उमेदवारांपैकी ४६ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणाची आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी छाननी केली. त्यापैकी २५ उमेदवारांच्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जमातीची वैधता प्रमाणपत्रे संशयास्पद असल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०१५ च्या पत्रान्वये त्यांनी कळविले आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी काही उमेदवारांकडून मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्यात आल्या असून मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक २ जुलै, २०१५ रोजी सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने पुढील आकस्मिक व संभाव्यता विचारात घेऊन याचिकाकर्त्यांना तात्पुरत्या स्वरुपात सेवेत रुजू करुन घ्यावे, असे आदेश पारित करुन याचिका निकाली काढलेली आहे. त्यानुसार स्थगिती देण्यात आलेल्या संबंधीत उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात येत आहे.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील नवापूर ते अमरावती या दरम्यानच्या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाबाबत

**(४१) * ९७०७ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील नवापूर ते अमरावती या पट्ट्यातील महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय आहे,
(२) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी जमीन संपादन करण्यात आली आहे काय, असल्यास केव्हा,

(३) जमिन संपादनाचे काम अद्यापही पूर्ण झाले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे यांनी दिलेल्या अहवालानुसार, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या नवापुर ते अमरावती लांबीच्या चौपदरीकरणाचे काम मे.एल ॲण्ड टी जी ई एच एल यांनी घेतले होते. परंतु सदरचा करारनामा रद्द झाला असून याबाबतचा पुरवणी करारनामा झाला आहे. नवापुर ते अमरावती या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या प्रकल्पाची तीन भागात पुनर्रचना करण्यात आली असून प्रकल्प, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या मुख्यालय नवी दिल्ली येथे निविदास्तरावर आहे.

(२) प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण आमरावती यांचे अहवालानुसार प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) भुसंपादनाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ) अमरावती ते चिखली - ८९%

ब) चिखली ते फागणे - ९२%

क) फागणे ते महाराष्ट्र-गुजरात सिमा - ८८%

-----------------

## नागपूर येथील रामसेतू या पुलाचे काम पुर्ण करण्याबाबत

**(४२) * ९७४७ श्री.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील रेल्वे स्टेशन जवळ रामसेतूचे काम MSRDS ने केले असून सदर पुलाचे फक्त एकाच साईडचे काम पूर्ण केले असून दुसऱ्या बाजूच्या पुलाचे काम अजूनपर्यंत प्रलंबित असून या दुसऱ्या बाजूच्या पुलाचे काम प्रलंबित असल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) या दुसऱ्या पुलाच्या मार्गिकेच्या कामाकरिता रेल्वे विभागाने काही रकमेची मागणी राज्य शासनाकडे केली आहे हे ही खरे काय,

(३) रेल्वेच्या अडेल तट्टू भूमिकेमुळे जसे एका बाजूच्या पुलाच्या मार्गिकेचे काम बरेच वर्ष रेंगाळले होते त्याचप्रमाणे आता दुसऱ्याही बाजूच्या पुलाच्या मार्गिकेचे काम रेल्वेच्या निधी मागण्याच्या भूमिकेमुळे प्रलंबित राहणार असून या प्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करुन उक्त पुलाच्या दुसऱ्या मार्गिकेचे काम पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही, दिनांक ०७.१२.२०१४ रोजी रामसेतूवरील एक बाजू वाहतुकीस खुली केली आहे. वाहतुक पोलिसांनी आता संपूर्ण वाहतुक या नविन तीन पदरी पुलावर वळविली आहे, तसेच नविन पुल जुन्या पुलापेक्षा रुंद असल्याने वाहतुकीची गैरसोय होत आहे.

(२) होय, रेल्वे विभागाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे कौडल चार्जेस ची मागणी केली आहे.

(३) रेल्वे विभागाकडे कोडल चार्जेस भरण्यातून सूट मिळण्याबाबत दिनांक १६.६.२०१५ रोजी विनंती करण्यात आली आहे. तसेच रेल्वे खात्याकडून दिनांक ०७.०५.२०१५ रोजी जुना पुल तोडण्याची परवानगी झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सन २००५ पुर्वीच्या अंध, अपंग, कर्मशाळा कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(४३) * ९८१८ श्री.श्रीकांत देशपांडे : तारांकित प्रश्न क्रमांक ५४८८ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अंध, अपंग, कर्मशाळा व विद्यालयातील २००५ पुर्वीच्या कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे अमरावती विभाग शिक्षक आघाडीच्यावतीने निवेदनाद्वारे दिनांक ६ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ पुर्वीच्या अंध, अपंग, कर्मशाळा कर्मचा-यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याविषयी शासनाचे धोरण काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना केव्हा लागू करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) सामाजिक न्याय विभागामार्फत अपंगांच्या कर्मशाळांमधील कर्मचा-यांना सेवानिवृत्ती वेतन मंजूर करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिपळूण आणि संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरवली आणि निवळी घाटातील रस्त्यांचे संरक्षक कठडे, अरुंद पूल तसेच जुने पूल दुरुस्तीबाबत**

**(४४) * १०११० श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण आणि संगमेश्वर तालुक्यातील आरवली आणि निवळी घाटातील रस्त्यांचे संरक्षण कठडे तुटले असून अरुंद व नादुरुस्त साईडपट्टया व धोकादायक दरडीमुळे पावसाळ्यात अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात याठिकाणी अपघात होऊ नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) अनेक अरुंद पुल, जुने पुल पुन्हा बांधणे आवश्यक आहे ते काम कधी हाती घेण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

ज्या ज्या ठिकाणी अपघातामुळे नुकसान झाले आहे त्या त्या ठिकाणी व रस्त्याचे दरडी कोसळणेची शक्यता आहे अशा ठिकाणी खात्यांच्या मजूरांमार्फत आवश्यकतेनुसार दुरुस्त्यांचे काम करुन घेण्यात येत आहे. सन २०१३-१४ च्या वार्षिक नियोजन आराखड्यातून सदर लांबी रस्ते सुरक्षेची कामे (उदा. क्रॅश बॅरिअर्स, कॅट आईज, डेलीनेटर्स व थर्मोप्लास्टीक रंग व सूचना फलक) करुन घेण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ (जुना १७) रस्त्याचे चौपदरीकरण कि.मी. १६१/०० ते ४५०/१७० लांबीतील १४ पुलांचे चौपदरीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून उर्वरित लांबीतील सर्व अरुंद पूल, जुने पूल व मोऱ्या यांचे काम चौपदरीकरणाचे प्रकल्पामध्ये समाविष्ट आहे.

-----------------

**यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर जाहिरातीचे फलक उभारल्याबाबत**

**(४५) * १०१५३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अनेक जाहिरातदारांनी रस्त्याच्या कडेला खाजगी जागा भाड्याने घेवून जाहिरातीचे मोठमोठे फलक उभारण्यासाठी आंबा, साग, सुबाभूळ, जांभूळ, खैर, उंबर, पिंपळ आदी दुर्मिळ वृक्षाची मोठ्या प्रमाणात कत्तल केल्याची बाब अनेक पर्यावरण वृक्षप्रेमींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,

(३) प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित जाहिरातदारांच्या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय. यासंदर्भात म.रा.र.वि. महामंडळाकडून वेळोवेळी पाहणी करण्यात येत असते. या पाहणीमध्ये प्रस्तुत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या हद्दीबाहेर दोन्ही बाजूस मोठमोठे जाहिरात फलक बसविण्यात आल्याचे आढळून आले आहे. याबाबत महामंडळाकडून कार्यवाही करण्याबाबत संबंधित यंत्रणांना कळविण्यात आले आहे.

(३) अशा स्वरुपाच्या खाजगी जमिनीवर जाहिरात फलक लावणे वा ते काढून टाकणे याबाबतची कार्यवाही करण्याबाबत म.रा.र.वि. महामंडळाकडून संबंधित यंत्रणांस विनंती करण्यात आली आहे तसेच अनधिकृतरीत्या वृक्षतोड झाल्यास संबंधित विभागास तक्रार दाखल करण्याची विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना मागील ५ महिन्यापासून मानधन न मिळाल्याबाबत

**(४६) * ७४३९ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील आर्थिक सहाय्य म्हणून संजय गांधी निराधार योजना, वृध्दापकाळ योजना राबविल्या जात असून सदर योजनेचा लाभार्थ्यांना गेल्या ५ महिन्यापासून त्यांचे मानधन देण्यात आले नसल्याचे दिनांक १९ मे, २०१५ रोजी उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निराधारांना मानधन उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,
(३) उपरोक्त प्रकरणी तातडीने मानधन उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२) अर्थसंकल्प अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणाली (बीम्स) वरील तांत्रिक अडचणीमुळे दिनांक १९ मे, २०१५ पर्यंत चंद्रपूर जिल्हयातील चंद्रपूर ग्रामिण, चंद्रपूर शहर, भद्रावती व कोरपना या तालुक्याचे फेब्रुवारी, २०१५ पर्यंतचे अनुदान वितरीत झाले होते. इतर तालुक्यात एप्रिल, २०१५ पर्यंत अनुदानाचे वाटप करण्यात आले होते.
(३) सद्यस्थितीत मे, २०१५ पर्यंत जिल्हयातील सर्व लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

-----------------

## कल्याण-भिवंडी (जि.कल्याण) तालुक्यांना जोडणाऱ्या उल्हास नदिवरील दुर्गाडी पुलास धोका निर्माण झाल्याबाबत

**(४७) * ६८५५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) १९९७ साली कल्याण-भिंवडी मार्गावरील दुर्गाडी किल्लाजवळ बांधण्यात आलेल्या दोन पदरी पुलाच्या पिलर भोवती बांधण्यात आलेली संरक्षक भिंत खाडीतून जाणाऱ्या लहान-मोठया जहाजांचा धक्का लागून तुटल्याने सदर पुलास धोका निर्माण झाल्याचे माहे जून, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) सदर बाब स्थानिक लोकप्रतिनिधीनी तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यास निवेदन देऊन निदर्शनास आणून दिली होती, हे ही खरे आहे काय,
(३) कल्याण खाडीतून मोठया प्रमाणात अवैधरीत्या रेती उपसा होत असल्याने व अद्यापर्यंत या पुलाच्या पिलरांच्या संरक्षक भिंती पुन:श्च बांधण्यात न आल्याने या पुलास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या पुलाच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती ठोस उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) होय, तथापि, सदरची भिंत ही संरक्षक भिंत नाही, तर अशा स्वरुपाची पुलाची बांधकामे करताना भोवताची जागा कोरडी ठेवण्यासाठी तात्पुरता बांध टाकावा लागतो. त्यानुसार पायव्याचे पाणी अडविण्यासाठी पुलाचे काम पूर्ण होण्याच्या कालावधीपुरता बांधलेला हा तात्पुरता बांध (coffer dam) आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांची होणारी अडवणूक**

**(४८) * ७७५० श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.संदिप बाजोरिया, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या होणाऱ्या अडवणुकीबाबत पणन विभागाचे कालबाहय झालेले नियम बदलण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी, फलोत्पादन व पणन या तिन्ही विभागांची एकत्रित सांगड घालून पणन मंडळाच्या माध्यमातून बाजार समित्या आणि शेतकरी यांचे हित लक्षात घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यांत येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) पणन कायद्यात दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव सध्या प्राथमिक अवस्थेत असून सदरच्या प्रस्तावावर विधी व न्याय विभागाशी विचारविनिमय सुरु आहे. तद्‌नंतर प्रस्तावास राज्य मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन विधानमंडळात प्रस्ताव सादर करावा लागेल.

-----------------

**मौजे कोळघर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आश्रमशाळेच्या बांधकामामध्ये झालेल्या दिरंगाईबाबत**

**(४९) * ६६८९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोळघर (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील आदिवासी जाती/जमातीच्या विद्‌यार्थ्यांसाठी आश्रमशाळा बांधण्याचे काम बी-१ कराराने ठेकेदारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ठेकेदाराने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्याने विद्‌यार्थ्यांची गैरसोय झाली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ठेकेदाराने मुदतीत काम न केल्याने ठेकेदारांविरुध्द निविदा शर्तीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) कार्यकारी आराखडयात बदल झाल्यामुळे आर.सी.सी. संकल्पनेत बदल करणे क्रमप्राप्त ठरल्याने नविन संकल्पचित्र तयार करण्यास विलंब झाला तसेच पावसाळयात बांधकामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य पोचु शकत नव्हते. सन २०१२ ते २०१४ या कालावधीत रेतीचा पुरेसा पुरवठा होत नव्हता. या सर्व कारणांमुळे कामाचे प्रगतीवर परिणाम होवून कामाला विलंब झालेला आहे. त्यामुळे कंत्राटदारास दिनांक ३१.१२.२०१३ पर्यत मुदतवाढ मंजुर करण्यात आलेली होती.

तथापि, काम विहित मुदतीत पुर्ण न केल्यामुळे संबंधित ठेकेदारास दिनांक ०१.०१.२०१४ पासुन प्रतिदिन रु २००/- प्रमाणे दंड आकारण्यात आलेला आहे.

-----------------

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील वास्तव्य असलेले घर खरेदीस दिरंगाई होत असल्याबाबत**

**(५०) * ६८७७ श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेंद्र मुळक, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडनमधील वास्तव्य केलेल्या लंडनमधील घर खरेदी प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी मा.सामाजिक न्यायमंत्री, मा.राज्यमंत्री व त्या विभागाचे प्रधान सचिव हे माहे एप्रिल, २०१५ मध्ये लंडन दौऱ्यावर गेले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परदेशी मालमत्ता खरेदी करण्याचा राज्य शासनाला अधिकार नसून यांसंदर्भात केंद्र सरकारमार्फत रितसर प्रस्ताव सादर करणे आवश्यक असताना मा.सामाजिक न्यायमंत्री, मा.राज्यमंत्री व विभागाचे प्रधान सचिव यांनी सदर दौरा केला तसेच दौऱ्यांचा संपूर्ण खर्च व यापूर्वी लंडन येथील वकील श्री.सायमन टॉस यांची फी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या निधीमधून केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामंडळाचा निधी अन्यत्र वळविणे हे बेकायदेशीर असून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी वापरण्यात येणारा निधी अन्यत्र वळविल्याने महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांवर परिणाम होणे तसेच सदर घर खरेदी करण्यास राज्याच्या वित्त विभागाने हरकत घेतल्याने घर खरेदीचा निर्णय बारगळण्याची शक्यता निर्माण होऊन दलित वर्गामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९२१-२२ मध्ये वास्तव्य केलेले लंडन येथील घर खरेदी संदर्भातील कार्यवाहीसाठी मंत्री (सामाजिक न्याय), राज्यमंत्री (सामाजिक न्याय) व प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) हे एप्रिल, २०१५ मध्ये लंडन दौऱ्यावर गेले होते.
(२) सदरहू घर खरेदीबाबत दिनांक ०३/०२/२०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत निर्णय घेतला आहे. त्यानंतर मंत्री (सामाजिक न्याय) व प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) यांनी मा. केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री महोदयांची तसेच केंद्रीय परराष्ट्र व्यवहार सचिव व भारताचे लंडन येथील उच्चायुक्त यांची भेट घेतली. या भेटी दरम्यान केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने व लंडन येथील भारतीय उच्चायुक्तांनी सदर वास्तू खरेदी संदर्भात राज्य शासनास सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासित केले. सदरहू घर खरेदी संदर्भात नेमलेले लंडन येथील सॉलिसिटर मे. सेडॉन यांची फी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या निधीतून अदा केली हे खरे नाही. लंडन येथील खरेदीच्या पध्दतीप्रमाणे सदर खरेदी करावयाच्या वास्तूच्या Asking Price च्या १० टक्के रक्कम म्हणून रु. ३.१० कोटी इतकी रक्कम महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळामार्फत मे. सॅडॉन यांच्या खाती जमा केली आहे.

तसेच उपरोक्त नमूद परदेश दौऱ्यांचा खर्च तात्पुरती व्यवस्था म्हणून महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळामार्फत केला. या खर्चाची महामंडळास प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे.

(३) सदरहू घर खरेदी संदर्भात महामंडळाने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येणार आहे. तसेच सदर घर खरेदी संदर्भातील कार्यवाही वित्त विभागाशी सल्लामसलत करुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रस्त्याच्या चौपदरीकरणाकरिता लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही रस्त्याची दुरुस्ती न झाल्याबाबत

**(५१) * ७३९८ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक २९०७ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना, देऊळगांव राजा, बेराळा, बेराळा फाटा, चिखली, अमडापूर, खामगाव, जि.बुलडाणा या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदीकरणाचे काम सन २०१० मध्ये सुरु करण्यात येऊनही सन २०१५ उजाडले तरी अद्‌याप पूर्ण करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या चौपदरीकरणाकरिता लाखो रुपयांचा निधी खर्च करुनही रस्त्याची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावर जागोजागी खडे पडल्यामुळे मोठया प्रमाणात अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्यांच्या कामाकरिता चार कंत्राटदार बदलण्यात आले असून कंत्राटदारांनी काम पूर्ण न करताही त्यांना आगाऊ रक्कम देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(६) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करुन कंत्राटदारांना काळ्या यादीत समावेश करण्यात आला आहे काय,

(७) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

खाजगीकरणांतर्गत बुलडाणा जिल्ह्यातील जालना, देऊळगांवराजा, बेराळा, बेराळा फाटा, चिखली, अमडापूर खामगांव या रस्त्यांच्या चौपदरीकरणाचे एकुण दोन प्रकल्प मंजूर होते. यापैकी जालना बेराळा फाटा (भाग १) व बेराळा फाटा चिखली खामगांव (भाग २) ही कामे अनुक्रमे ३१.३.२००९ व १९.५.२०१० पासून सुरु होती. मुळ उद्योजकाने ही कामे अनुक्रमे ३१.३.२०११ व १८.५.२०१२ पूर्ण करणे अपेक्षित होते. परंतू मुळ उद्योजक, भाग १ मे. केटी टोल इन्फ्रास्ट्रचर प्रा.लि. इंदोर व मे. केटी बिल्डकॉन प्रा.लि.इंदोर या उद्योजकाने काम विहीत वेळेत पूर्ण केले नाही.

मुळ उद्योजक काम करत नसल्याने सदर उद्योजकाऐवजी निविदा शर्तीनुसार व अग्रणी बॅकेच्या शिफारशी नुसार विध्यवासींनी मेगास्ट्रक्चर प्रा.लि., मुंबई या कंपनीस पर्यायी उद्योजक (Substitute) म्हणून शासनाने मान्यता दिली. दि.०१.०२.२०१३ रोजी Supplementary Agreement व Substitution Agreement ची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. या करारनाम्यानुसार नविन पर्यायी उद्योजकाने भाग - १ चे काम ६ महिन्यात (दि.३१.७.२०१३) पर्यंत व भाग-२ चे १२ महिन्यांत (दि.३१.१.२०१४) पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. तसे न घडल्याने दि. २१.१.२०१४ रोजी दोन्ही प्रकल्पाच्या उदयोजकाचे “TOLL RIGHT” निलंबित करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

उपरोक्त भाग-१ साठी एकुण शासन सहभाग एकुण रु. ४७.२७ कोटी पैकी उद्योजकास रु. ४३.१५ कोटी इतका सहभाग भाग -२ साठी एकुण शासन सहभाग रु. ८५.४० कोटी पैकी उद्योजकास रु. १७.१० कोटी (राज्य शासन रु. १७.१० कोटी व केंद्र शासन रु.०.०० कोटी) इतका सहभाग अदा करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत भाग-१ व भाग-२ चे अनुक्रमे अंदाजे ६७% ३७% काम पूर्ण झालेले आहे. सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे.

(३) हे खरे नाही.

पोलीस विभागाच्या अहवालानुसार झालेले बहुतांशी अपघात हे वाहन चालकांच्या हलगर्जीपणामुळे झालेले असलयाचे दिसून येते.

(४) हे खरे नाही.

भाग-१ व २ साठी अनुक्रमे मे.केटी टोल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., इंदोर व मे. केटर बिल्डकॉन इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. इंदोर हे मुळ उद्योजक होते व भाग १ व २ साठी मे. विर्ध्यावासीनी टोल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., मुंबई हे पर्यायी उद्योजक होते.

भाग-१ साठी एकुण शासन सहभाग एकुण रु.४७.२७ कोटी पैकी उद्योजकास रु.४३.१५ कोटी इतका सहभाग व भाग-२ साठी एकूण शासन

सहभाग रु. ८५.४० कोटी पैकी उद्योजकास रु.१७.१० कोटी इतका सहभाग अदा करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत भाग-१ व भाग -२ चे अनुक्रमे अंदाजे ६७% ३७% काम पूर्ण झालेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) भाग-१ व भाग-२ च्या मुळ उद्योजकाचा समावेश शासनाच्या दि. १९.१२.२०१३ च्या पत्रान्वये काळ्या यादीत करण्यात आलेला आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दलित वस्त्यांमध्ये सौर पथदिव्यांसाठी योजना राबविताना निविदा न मागविता ठेकेदार (दर करार) पध्दतीने निश्चित करुन केलेला गैरव्यवहार

**(५२) * ७०३४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.राजेंद्र जैन, श्रीमती स्मिता वाघ, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.सुधीर तांबे, ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दलित वस्त्यांमध्ये उजेड असावा यासाठी सामाजिक न्याय विभागाने सन २०१३-१४ या वर्षापासून चार वर्षाचा कार्यक्रम हाती घेऊन सुमारे ३४० कोटी रुपयांचा सौर पथदिव्यांच्या योजनेसाठी निविदा मागविण्या ऐवजी रेट कॉन्ट्रॅक्ट (दर करार) पध्दतीने ठरविले व योजनेच्या रक्कम रुपये ३४० कोटीपैकी पहिल्या दोन वर्षात सुमारे १०२ कोटी रुपये खर्च केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजना राबविण्यासाठी एवढया मोठया रकमेच्या खर्चाच्या निविदा न मागविता रेट कॉन्ट्रॅक् (दर करार) पध्दतीने ठेकेदार निश्चित करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त ठेकेदारांची कोणत्या निकषानुसार निवड करण्यात आली आहे,

(४) असल्यास, या ठेकेदारांनी आतापर्यंत किती दलितवस्त्यांमध्ये सौर पथदिवे लावण्यात आले आहेत,

(५) असल्यास, त्यापैकी किती सौर दिवे कार्यान्वित आहेत,

(६) नसल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२), (३), (४), (५) व (६) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तींचा विकास करणे या योजनेतर्गत सन २०१३-१४ ते २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता दलित वस्त्यांमध्ये पथदिवे पुरवठा करुन स्थापीत करणेबाबत महाराष्ट्र ऊर्जा विकास संस्था (मेडा) यांच्या दरकरारावर नोंदविण्यात आलेल्या पुरवठा धारकास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सौर पथदिव्यांबाबतच्या प्राप्त तक्रारीनुषंगाने संबंधित संबंधित पुरवठा धारकास नोटीस बजावण्यात आलेली आहे. तसेच अतिरीक्त आयुक्त, सह आयुक्त, उपायुक्त व सहायक आयुक्त यांना तसेच प्रत्येक जिल्ह्यातील १० वस्त्यांची तपासणी करणेबाबत महासंचालक, मेडा, पुणे यांना कळविले आहे. त्यांचेकडून अहवाल अप्राप्त आहे. सद्यस्थितीत २२८७ दलीत वस्त्यांमध्ये २४९५९ पथदिवे लावण्यात आले असून १९१७२ पथदिवे कार्यान्वित आहेत. दि.३१/३/२०१५ नंतर दलित वस्त्यांमध्ये सौर पथदिवे पुरवठा न करणेबाबत सर्व पुरवठा धारकांना कळविले आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १२/५/२०१५ अन्वये सौर पथदिवे लावण्याबाबतचे आदेश रद्द करण्यात आले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आदिवासी वसतिगृहांना शासकीय इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देणेबाबत

**(५३) * ८४०८ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागाची १०४ पैकी ८९ वसतिगृहे अद्याप भाडयाच्या इमारतीत असून या भाडयापोटी शासनाचे वर्षाला सात कोटी रुपये खर्च करावे लागत असल्याचे माहे मे - २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी समाजकल्याण विभागाने शहर व तालूका स्तरावर मुलामुलींचे शेकडो वसतिगृहे शासकीय इमारतीत असल्याने आदिवासी विभागाने आदिवासी वसतिगृहे शासकीय इमारतीत का उभारण्यात आली नाही यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, राज्यशासनाने आदिवासी वसतिगृहाच्या भाडयापोटी करोडो रुपये द्यावे लागत असल्याने आदिवासी विभागाने वसतिगृहे शासकीय इमारतीत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, चालु आर्थिक वर्षात आदिवासी वसतिगृह बांधण्याबाबत निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणीतच कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी मुला/मुलींकरिता एकूण ४९५ वसतिगृहे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यस्थितीत ४९० वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर ४९० शासकीय वसतीगृहांपैकी ३६३ ठिकाणी जमीनी प्राप्त असुन १२७ ठिकाणी जमिनी अप्राप्त आहे. तसेच १३४ शासकीय वसतीगृहे शासकीय इमारतीत असुन ३५६ शासकीय वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. या ३५६ शासकीय वसतिगृहांच्या इमारतींच्या भाड्यापोटी सदर इमारतीच्या घरमालकांना वर्षाला अंदाजे रुपये २९.०० कोटी इतकी रक्कम शासनाला वितरीत करावी लागते.
(२) आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी मुला/मुलींकरिता जिल्हा, तालुका तथा महानगरामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय त्वरेने उपलब्ध व्हावी या उद्देशाने शासकीय वसतीगृहाकरिता स्थानिक स्तरावरुन उपलब्ध इमारती भाडेकराराने घेऊन त्यामध्ये प्रथम वसतीगृह सुरू करण्यात येते. त्यानंतर जमिनीच्या उपलब्धतेनुसार त्यावर शासकीय इमारतीचे बांधकाम करण्यात येते. सद्यस्थितीत ५४ वसतिगृह इमारतींचे बांधकाम सुरू आहे.
(३) जमीन अप्राप्त असलेल्या १२७ ठिकाणी जमीन मिळविण्याबाबत प्रकल्प स्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे स्तरावरुन सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्यासमवेत होणा-या बैठकांमध्ये जमीन मिळविण्याबाबत तसेच जमीन प्राप्त असलेल्या ठिकाणी अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना वेळोवेळी दिल्या जातात.

वसतिगृहाकरिता जमीन उपलब्ध झाल्यानंतर इमारत बांधकामाची अंदाजपत्रके मागविण्यात येतात. सदर इमारतीच्या अंदाजपत्रकांना सार्वजनिक

बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात येते.
(४) सन २०१५-२०१६ या वर्षात शासकीय आदिवासी मुला/मुलींचे शासकीय वसतीगृह इमारत बांधकामासाठी राज्यस्तर व जिल्हास्तर या योजनेंतर्गत एकुण १४७९४.२४ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सायन-पनवेल महामार्गावर तुर्भे उड्डाणपुलाजवळ अर्धवट बांधण्यात आलेल्या स्कॉय वॉकमुळे नागरीकांची होत असलेली गैरसोय.**

**(५४) * ७१५९ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायन-पनवेल महामार्गावर तुर्भे उड्डाणपुलाजवळ अर्धवट स्कॉयवॉक बांधण्यात आला आहे त्यामुळे नागरिकांना अर्धा रस्ता जीव मुठीत घेऊन ओलांडावा लागत असल्याचे माहे मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सानपाडा गावातून येणाऱ्या नागरिकांना रस्ता ओंलाडता यावा यासाठी तुर्भे एमआयडीसी पोलीस स्टेशनजवळ एक स्कॉयवॉक तयार करण्यात आला आहे परंतू या पुलाचे नियोजन पुर्णपणे चुकले आहे उड्डाणपुलाकडे जाणाऱ्या मार्गिकेपर्यतच पूल तयार केला आहे हे पाहता शासन त्वरीत याबाबत नागरिकाचे होणारी गैरसोय पाहता शासन त्वरीत प्रश्न १ बाबत आवश्यक कार्यवाही करणार आहे काय,
(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) सानपाडा गावातून येणाऱ्या नागरिकांना रस्ता ओलांडता यावा यासाठी तुर्भे एमआयडीसी पोलीस स्टेशनजवळ सायन पनवेल महामार्गाच्या प्रस्तावित रुंदीकरणाच्या ७+७ मार्गीका तसेच सेवा रस्ता ओलांडण्यासाठी महामार्गाच्या पुर्ण रुंदी इतक्या लांबीचा पादचारी उड्डाणपूल करण्याचे नियोजन आहे. पैकी पनवेलकडे जाणाऱ्या मार्गीकेवरील पादचारी उड्डाणपूलाचा भाग पूर्ण करण्यात आलेला आहे व मुंबईकडे जाणाऱ्या मार्गीकेवरील उर्वरित भाग हा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळ यांच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीच्या स्थलांतरानंतर त्वरित करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पेण (जि.रायगड) येथील पेण अर्बन बँकेतील आर्थिक घोटाळ्याची चौकशी होण्याबाबत**

**(५५) * ८३२६ श्री.अनिल तटकरे, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.गुरुमुख जगवानी :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील पेण अर्बन बँकेत बोगस कर्जखात्याद्वारे आर्थिक गैरव्यवहाराला चार वर्ष पूर्ण होऊन अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर घोटाळयाचा तपास तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(४) असल्यास, सदर घोटाळयाच्या चौकशीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) सदर बँकेमधील गैरव्यवहाराबाबत सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांच्या दि. २९.३.२०११ रोजीच्या आदेशान्वये कलम ८८ खाली नियुक्ती केलेल्या प्रधिकृत अधिकाऱ्यांनी रु. ८६८.०४ कोटी इतक्या रकमेची जबाबदारी ७२ व्यक्तींवर निश्चित करुन त्यांच्यावर जलम ९५ अन्वये जप्तीच्या नोटीसा देऊन मालमत्ता जप्त केल्या आहेत. तथापि, सहकारी अपिलेट न्यायालयाने संचालक मंडळाच्या मालमत्ता जप्त न करणेबाबतचे आदेश दि. २०.२.२०१४ रोजी दिले आहेत. तसेच पेण पोलीस स्टेशन तपास अधिकारी यांनी भारतीय दंड विधान संहितेमधील कलमान्वये बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द गुन्ह्याची नोंद करुन अटक केली. पोलीस तपासाअंती ४५ व्यक्तीविरुध्द २ चार्जशीट फौजदारी न्यायालय, पेण येथे दाखल केले आहे.

बँकेच्या रकमेतुन खरेदी केलेल्या रायगड जिल्हृयातील दोन मालमत्ता तसेच १२८ बोगस कर्ज खात्यातुन खरेदी केलेल्या श्री. शैलेश देशपांडे व इतर यांच्या नावे असलेल्या ३९ मालमत्ता गृह विभागाच्या दि. २४.०७.२०१३ च्या अधिसुचनेद्वारे उप विभागीय अधिकारी, पेण यांनी जप्त केल्या असून त्यापैकी १५ मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीची प्रक्रीया सुरु केली आहे. सदर मालमत्तांच्या ७/१२ नोंदी केल्या आहेत.

जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड यांनर १२८ बोगस कर्जदारांच्या तपासणी करिता दि. ०८.४.२०१५ रोजीच्या पत्रान्वये ५ पोलीस अधिकाऱ्यांच्या विशेष पथकाची नेमणुक केली असून तपास प्रगतीपथावर आहे.

-----------------

## मुंबई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील कामांचे मेजरमेंट बुक वांद्रे येथील बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात आढळल्याबाबत

**(५६) * ७२१७ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील कामांचे मेजरमेंट बुक (एम.बी) मोठया प्रमाणात वांद्रे येथील बांधकाम विभागाच्या विश्रामगृहातील एका खोलीत आढळले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपरोक्त विषयी चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

मुंबई सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील कामांच्या मेजरमेंट बुक (एम.बी) वांद्रे येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहातील एक खोलीत माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये आढळून आले आहेत.

(२) मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांचेकडून चौकशी अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोधडी (जि.नांदेड) येथील उमरवाडी ते डोंगरगाव (चि.) येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत

**(५७) * ७०६४ श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोधडी (जि.नांदेड) येथील उमरवाडी ते डोंगरगाव (चि.) येथे ३०० लोकवस्तीचे आदिवासी जमातीचे गाव असून येथे असलेल्या कच्चा रस्त्यामुळे गावातील दळणवळण सेवा ठप्प झाली असून शेतकऱ्यांना खत किंवा इतर धान्य विक्रीसाठी बाजारपेठेत नेण्यासाठी डोक्यावर किंवा बैलगाडीच्या सहाय्याने आणावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी असलेल्या नागरीकांची समस्या लक्षात घेता उमरवाडी ते डोंगरगाव या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, खरे आहे.
(२) व (३) रस्ता नियोजन बाहय असल्याने शासनाच्या निकषात बसत नाही. रस्ता नियोजनात समाविष्ठ झाल्यावर उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**आंतरराष्ट्रीय बाजारात घसरलेल्या सोयाबीन तेलाच्या किंमतीमुळे विदर्भातील सोयाबीन कारखाने धोक्यात आल्याबाबत**

**(५८) * ८६९६ श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात गेल्या दोन दशकांमध्ये मोठ्या प्रमाणावर सोयाबीनवर प्रक्रिया करणारे अनेक कारखाने उभारण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वायदे बाजारातील सट्टेबाजांकडून पसरवण्यात येणाऱ्या अफवा आणि आंतरराष्ट्रीय बाजारात घसरलेल्या सोयाबीन तेलाच्या किंमतीचा परिणाम महाराष्ट्र राज्यातील सोयाबीन प्रक्रिया करणाऱ्या कारखानांना जाणवू लागल्यामुळे विदर्भातील सोयाबीन प्रक्रिया कारखाने धोक्यात आले असल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सट्टेबाजांकडून वायदा बाजारात केली जाणारी गडबड रोखण्यासाठी तसेच सोयाबीनची उत्पादकता वाढविण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) विदर्भात सोयाबीनवर प्रक्रिया करणारे एकूण ३१ सोयाबीन प्रक्रिया उद्योग आहेत.
(२) हे खरे नाही, तथापि, विदर्भातील ३१ सोयाबीन प्रक्रिया कारखान्यांपैकी ६ कारखाने तात्पुरत्या स्वरुपात बंद आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यस्तरीय योजनेसाठी आदिवासी क्षेत्रातील १० नगरपरिषदेसाठी असलेली लोक वर्गणीची अट शिथील करणेबाबत

**(५९) * ९०९४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यस्तरीय योजनेसाठी आदिवासी क्षेत्रातील १० नगरपरिषदेसाठी लोकवर्गणीची अट शिथिल करावी अथवा लोकवर्गणीचा हिस्सा आदिवासी विकास विभागाने भरावा, यासंदर्भात मंत्रीमंडळांच्या बैठकीत संबंधित विषय त्वरीत मंजूर करण्यात यावा, याबाबत मा. सभापती यांनी अर्थसंकल्पिय अधिवेशनात निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे काय,

(३) असल्यास, याबाबत प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी करण्यात येईल,

(४) अद्याप, याबाबत निर्णय घेण्यात आला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२), (३) व (४) मार्च, २०१५ च्या विधानमंडळ अधिवेशनात मा.श्री चंद्रकांत रघुवंशी व इतर विधानपरिषद सदस्य यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मा. तालिका सभापती यांनी “मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, लोकांना पिण्यासाठी शुध्द पाणी मिळाले पाहिजे. या ठिकाणी माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सांवत उपस्थित आहे. त्या भागात वॉटर प्रोन डिसीज मोठया प्रमाणावर आहे. तेव्हा त्या भागात शुध्द पाणी देणे हे शासनाचे काम आहे, आपण जर तर अशी उत्तर न देता, हा प्रश्न कसा सोडविता येईल हे पहावे. केवळ पैशाअभावी नगरपरिषदा या योजना राबवू शकत नसतील तर त्या योजना राबविण्याच्या दृष्टीने तातडीने जो काही प्रस्ताव असेल तो मंत्रिमंडळापुढे घेऊन जाणे गरजेचे आहे. आपण तसे तातडीने करावे असे मी निर्देश देत आहे” अशा सूचना केल्या आहेत.

तदनुषंगाने, नगर विकास विभागाच्या तसेच शासनाच्या इतर विभागांकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेंतर्गत आदिवासी क्षेत्रातील नगरपरिषदांचा लोकवर्गणीचा/ नगरपरिषदेचा हिस्सा आदिवासी उपयोजनेतून देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणण्यासाठी नगर विकास विभागाचे अभिप्राय उपलब्ध करुन घेण्यासाठी दिनांक १५.०५.२०१५ रोजी प्रस्ताव नगर विकास विभागास सादर केला आहे. त्यावर नगर विकास विभागाचे अभिप्राय अद्याप अप्राप्त आहेत. ते प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## जळगांव जिल्हयातील जळगांव शहरासह तालुक्यातील २६ पतसंस्थांनी शासनास रक्कम परत करण्याबाबत

**(६०) * ९७०८ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील जळगांव शहरासह तालुक्यातील २६ पतसंस्थांनी सुमारे ९ कोटी रुपये शासकीय अर्थसहाय्यत घेवून मुदत संपूनसुध्दा ही रक्कम शासनास परत केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती संस्थांनी ही रक्कम परत केलेली नाही,

(३) या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत संस्थांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) जळगांव शहर व तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेल्या ४७ पतसंस्थांना शासनामार्फत अर्थसहाय्य केले होते. त्यापैकी ३१.०५.२०१५ अखेर १९ पतसंस्थांनी त्यांना प्राप्त झालेल्या अर्थसहाय्याची संपुर्ण परतफेड केलेली आहे. उर्वरित २८ पतसंस्थांकडे शासनास वसुलीस पात्र रक्कम रु.९,७७,३२,५५० इतकी आहे.

(३) व (४) या संदर्भात २८ पतसंस्थांकडून शिल्लक येणे वसूलीसाठी खालील प्रमाणे प्रयत्न करण्यात येत आहेत.

१) जळगांव तालुक्यासाठी दोन स्वतंत्र वसुली पथकाची नेमणुक करुन वसुली पथकांकडून संस्थांच्या हमीपत्र करुन दिलेल्या जबाबदार संचालकांच्या जंगम मालमत्ता जप्त करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे.

२) २८ पतपंस्थांपैकी १० पतसंस्थांच्या/क १०० व नियम ८५ अन्वये संस्थेच्या नावे हस्तांतरित करण्यात आलेल्या १४ मालमत्तांचा शोध घेवून त्यांच्यावर जप्ती बोजे बसविण्याचे कामकाज करण्यात येत आहे.

३) ज्या १८ पतसंस्थांकडे स्वमालकीची मालमत्ता नाही अशा अर्थसहाय्य मिळण्याकामी हमीपत्र करुन दिलेल्या जबाबदार संचालकांच्या स्वमालकीच्या मालमत्तांचा शोध घेवून त्यांच्या नावे जप्ती बोझे बसविण्याचे कामकाज सुरू आहे. सदर मालमत्तांची अपसेट प्राईज निश्चित करुन जाहीर लिलावाने विक्री करण्याचे व त्यातुन शासन अर्थसहाय्याचा भरणा करून घेण्याचे कामकाज सुरू आहे.

-----------------

**मुंबई नवी मुंबईसह ठाणे जिल्ह्यातील भटक्या विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांसाठीची कल्याण मोहने येथील आश्रमशाळा स्थलांतरणाचा घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत**

**(६१) * ६८७० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नवी मुंबई, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, डोंबिवली, वसई, भाईंदर परिसरात राहणाऱ्या भटक्या-विमुक्त मुलांचे पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करणारी ठाणे जिल्ह्यातील एकमेव आश्रमशाळा कल्याण जवळील मोहने येथे २५ वर्षांपासून चालविली जाते, हे खरे आहे काय,

(२) या संस्थेला शासनाचे १०० टक्के अनुदान मिळत असून सध्या ४२६ विद्यार्थी या आश्रमशाळेत शिक्षण घेतात तर २१७ विद्यार्थी निवासी तत्वावर शिक्षण घेतात हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १०० टक्के शासकीय अनुदान प्राप्त असलेली हि शाळा २५ वर्षानंतर संस्थाचालकांनी सोलापूर मधील माळशिरस तालुक्यातील मोरोची या गावी स्थलांतरित करण्याची शासनास विनंती केल्याने, त्यास तत्परतेने मान्यता देऊन शाळा स्थलांतरण करण्यास सामाजिक न्याय विभागाने मान्यता दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील भटक्या-विमुक्त विद्यार्थी आणि पालकांबाबत तसेच या शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अडचणी लक्षात न घेता शासनाने घाईघाईने हा निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) सदरहू निर्णय त्वरित रद्द करुन शासन या विद्यार्थ्यांना न्याय देण्यासाठी कोणती उपाययोजना करणार आहे ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) होय.

(४) ठाणे जिल्ह्यात समाज जागृती व सेवासंघ, मोहाने, ता.कल्याण, जि.ठाणे संचलित विजाभज प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा मोहाने, ता.कल्याण, जि.ठाणे येथे २५ वर्षापासून कार्यरत आहे. संस्थेला शासनाकडून १०० टक्के अनुदान मंजूर करण्यात येते.

सदर आश्रमशाळा भाड्यांच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे. सन २००५ मध्ये अतिवृष्टीमुळे आलेल्या पुरामध्ये संस्थेचे पूर्ण रेकॉर्ड पाण्यात भिजून खराब झाले. आश्रमशाळेच्या परिसरात विजाभज प्रवर्गातील अपुरी लोकसंख्या, तेथील भौगोलिक परिस्थिती व भाडे तत्त्वावरील अपुरी इमारत इत्यादी कारणास्तव सदर आश्रमशाळेचे शासन निर्णय दि. ३०.०८.२०१४ अन्वये सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील मोरुची या गावी स्थलांतर करण्यात आले. परंतु सदरील बाब न्यायप्रविष्ठ असून सद्यस्थितीत शासन निर्णयास स्थगिती आहे. त्यामुळे सद्यस्थितीत आश्रमशाळा मोहाने, ता.कल्याण, जि.ठाणे येथे सुरु असून आश्रमशाळेमध्ये ४२६ विद्यार्थी शिक्षण घेतात व त्यापैकी २१७ विद्यार्थी निवासी आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्रीमती नलिनीताई गजानन पुरंदरे विद्यालय, मुलूंड येथे सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम इतर ठिकाणी खर्च केल्याबाबत**

**(६२) * ७७५३ श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.संजय दत्त, श्री.जर्नादन चांदूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मुलुंड (पश्चिम) येथील श्रीमती नलिनीताई गजानन पुरंदरे विद्यालयातील इयत्ता १ ली ते इयत्ता १० वीच्या वर्गातील अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थीनींना सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत मिळणाऱ्या शिष्यवृत्तीची रक्कम शाळेच्या व्यवस्थापनाने वीजबिल, पाणी बिलासाठी व दैनंदिन खर्चासाठी वापरण्याची बाब नुकतीच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कारवाई केली आहे,

(४) अद्याप, चौकशी वा कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) सदर विद्यालयातील गैरव्यवहाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई यांनी चौकशी समिती नेमली होती.

(३) सदर समितीच्या चौकशीमध्ये मागासवर्गीय मुलीना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवणे, अवितरीत रकमा शासनजमा न करता त्या कार्यालयीन बाबींवर खर्च करणे, परीक्षा फीचे वितरण न करणे, आदिवासी संवर्गातील मुलींचे शिष्यवृत्तीचे प्रस्ताव आदिवासी विकास विभागाकडे सादर न करणे इत्यादी बाबी उघडकीस आल्या आहेत. सदर बाबीच्या अनुषंगाने शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापकाविरुध्द गुनहा दाखल करणेबाबत कळविण्यात आले आहे.

सदर प्रकरणी महाराष्ट्र अनुसूचित जाती जमाती आयोग यांचेकडे सुनावणी झाली असून त्यांनी चौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेश दिले आहेत. त्यानुषंगाने शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांनी शिक्षण निरीक्षक, मुंबई यांना सदर विद्यालयाची चौकशी करुन कार्यवाही करणोबाबत कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हयातील शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे पाच वर्षासाठी पुनर्गठन करण्याबाबत

**(६३) * ७४०१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील दुष्काळी परिस्थितीत कर्जदार शेतकऱ्यांच्या कर्जाचे पाच वर्षासाठी पुनर्गठन करुन, त्यांना पुन्हा पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाचा आदेश प्राप्त न झाल्याने कर्जाचे पुनर्गठन करण्यास जिल्हयातील बँकाकडून टाळाटाळ होत असणे, सन २०११-१२ पासून जिल्हयातील शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे, त्यातच बँकाकडे नाहक हेलपाटे घालावे लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, पीक कर्जाचे पाच वर्षासाठी पुनर्गठन करण्याबाबतच्या कर्जदार शेतकऱ्यांच्या मागणीबाबत शासन स्तरावर काय निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्जाच्या रुपांतराची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीयकृत व ग्रामीण बँकाकडून कर्जाच्या रुपांतराची कार्यवाही सुरु आहे.
(३) होय,

अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून कर्जाच्या रुपांतराची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीयकृत व ग्रामीण बँकाकडून कर्जाच्या रुपांतराची कार्यवाही सुरु आहे.
(४) अकोला जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून व राष्ट्रीयकृत तसेच ग्रामिण बँकेकडून शेतकऱ्यांच्या कर्जाचे ५ समान वार्षिक हप्त्यात रुपांतर करण्यात येत आहे. रुपांतर करताना ५ वार्षिक हप्ते पाडून देण्यात येत आहेत.
(५) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालवण-देवगड (जि.सिंधुदुर्ग) मार्गावरील चिंदर-कुडोपी तसेच सिंदर-नागाचीवाडी या जोडरस्त्याची झालेली दुरवस्था**

**(६४) * ८३३० श्री.अनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण-देवगड (जि.सिंधुदूर्ग) मार्गावरील चिंदर-कुडोपी तसेच सिंदर-नागाचीवाडी या जोडरस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहन चालकांसह विद्यार्थी व ग्रामस्थांचे प्रवासा दरम्यान हाल होत असल्याने चिंदर-नागाचीवाडी युवक मंडळ, मुंबई यांच्यावतीने जिल्हयाचे मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दहा वर्षापासून सतत जिल्हा परिषद बांधकाम विभाग, मालवण यांच्याकडे रस्ता दुरुस्त करण्याबाबत मागणी करुनही कोणतीच कार्यवाही केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदरहू रस्ता दुरुस्त करण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) निवेदन ह्याविभागास प्राप्त नाही.
(२) व (३) चिंदर-कुडोपी या रस्त्याच्या कि.मी.४/५०० ते ५/००० व ५/६०० ते ५/७०० या ६०० मीटर लांबीतील रस्त्याचा पृष्ठभाग खराब झालेला असून उर्वरित लांबीतील रस्त्याचा पृष्ठभाग सुस्थितीत आहे. खराब लांबीतील काम निकष व निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचा प्रयत्न राहील.

चिंदर-नागाचीवाडी हा रस्ता योजनाबाह्य असल्याने शासन निकषात बसत नाही.

-----------------

**राज्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांना देण्यात येणाऱ्या शेगड्यांचे वाटप न करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(६५) * ९०९५ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३८८७ ला दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भात-:** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांना देण्यासाठी कोटयावधी रुपये खर्चून सन २००६-२००७ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या तब्बल २५५२७ शेगडया गेल्या ९ वर्षापासून सरकारी गोदामात पडून असल्याबाबत मा. आदिवासी विकास मंत्री यांना लक्षवेधी निवेदनात चौकशी सुरु असल्याचे स्पष्ट केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जादा शेगडया वितरीत न करता नादुरुस्त होईपर्यंत ठेवण्यात आलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, याप्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्यांवर वसूलीची दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय
(२) जनहित याचिका क्र. १५३/२०१२ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त केली असून चौकशी सुरु आहे.
(३), (४) व (५) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-----------------

**अमळनेर-पारोळी ( जि.जळगांव) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(६६) * ९७१२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर-पारोळी (जि.जळगांव) येथील रस्त्याची दुरवस्था झाली असून त्याठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) (२) व (३) सदर रस्त्यावर वाळू वाहतुक करणाऱ्या अवजड वाहनांमुळे रस्ता काही ठिकाणी क्षतीग्रस्त होत असतो. तथापि, रस्त्याची दुरुस्ती वेळोवेळी करण्यात आली असून सद्य:स्थितीत रस्ते सुस्थितीत आहेत. हया रस्त्यावर झालेले अपघात रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे झालेले नाहीत.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**

**मुंबई.** **सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.